मुंबई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in    E mail - dainikyuvakaadhar@gmail.com    facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : २५६ ■ शुक्रवार, २९ मे २०२६ ■ किंमत : २ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514




# ऊस आणि कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांची केंद्र सरकारकडून दखल – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह यांच्याशी राज्याच्या प्रतिनिधींची सविस्तर चर्चा

**नवी दिल्ली :** साखरेच्या किमान आधारभूत किंमतीत वाढ करणे, इथेनॉल कोटा वाढवणे, कर्ज पुनर्गठन, व्याज सवलत, शेतकऱ्यांकडून थेट कांदा खरेदी, शेतीमालाचे ग्रेडिंग, कांदा बियाण्यांवर अधिभार आदी शेतकऱ्यांच्या महत्त्वाच्या प्रश्नांबाबत केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह यांच्यासोबत झालेल्या सकारात्मक चर्चेमुळे राज्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार असून याबाबत लवकरच केंद्र सरकार अनुकूल निर्णय घेणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

नवी दिल्ली येथे महाराष्ट्रातील साखर कारखानदारी, ऊस आणि कांदा उत्पादक शेतकरी यांच्या विविध अडचणींसंदर्भात केंद्रीय सहकार मंत्री शाह यांच्यासोबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह संबंधित मंत्री आणि विविध संस्थांच्या प्रतिनिधींची चर्चा झाली.

केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान आणि केंद्रीय सार्वजनिक वितरण मंत्री प्रल्हाद जोशी हेही या बैठकीस उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, जलसंपदा मंत्री गिरीष महाजन, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, पणन मंत्री जयकुमार रावल, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्र सिंह भोसले, खा. धनंजय महाडिक, आ. दिलीप वळसे-पाटील, जयंत पाटील, डॉ. राहुल



आहेर, राहुल कुल, अभिमन्यु पवार, डॉ.विनय कोरे, राजेश टोपे, राष्ट्रीय सहकारी साखर महासंघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील, राज्य सहकारी साखर महासंघाचे जयप्रकाश दांडेगावकर, रणजितसिंह निंबाळकर, मुख्यमंत्री कार्यालयाचे अतिरिक्त मुख्य सचिव लोकेश चंद्र, सुहकार व पणन विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे, सहकार आयुक्त दीपक तावरे, कृषी आयुक्त सुरज मांढरे, साखर आयुक्त संजय कोलते आदी उपस्थित होते.

साखरेच्या प्रश्नांवर केंद्रीय सहकार मंत्र्यांसोबत अत्यंत सकारात्मक चर्चा झाल्याबाबत समाधान व्यक्त करून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, साखरेची किमान आधारभूत किंमत वाढवणे गरजेचे असल्याचे केंद्रीय मंत्री शाह यांनी मान्य केले आहे. इथेनॉलचा कोटा मोठ्या प्रमाणात वाढवण्यासाठी येत्या दोन महिन्यांत निर्णय घेण्याबाबत त्यांनी सहमती दर्शवली असून कर्ज पुनर्गठनासंदर्भात राज्य शासनासोबत एकत्रितपणे काम करून मार्ग काढण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. त्यासह व्याज सवलतीचे (इंटरेस्ट सबव्हेंशन ) पैसे तात्काळ देण्याचे मान्य करण्यात आले करण्यात आले आहे. 'क्वेल प्राइजिंग' (किंमत नियंत्रण) संदर्भात केंद्राने एक प्रस्ताव मागवला असून, राज्य शासनाकडून तो तयार केला आहे व लवकरच सादर केला जाईल. या प्रकल्पामुळे साखर कारखानदारीचे अनेक प्रश्न सुटण्यास मदत होईल.कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांवरही सकारात्मक निर्णय झाले असल्याची माहिती देऊन मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, नाफेड आणि एनसीसीएफने सुरू केलेली कांदा खरेदी बाजारात थेट व्यापाऱ्यांकडून न होता, थेट शेतकऱ्यांकडून केली पाहिजे ही मागणी मान्य करण्यात आली आहे. २ लाख टनांऐवजी १० लाख टन कांदा खरेदी नाफेड आणि एनसीसीएफने करावी, यावर सकारात्मक निर्णय होण्याची अपेक्षा आहे. सध्या कांद्याचे बियाणे मोठ्या प्रमाणात निर्यात होत असल्याने देशांतर्गत कांद्याला एक्सपोर्ट मार्केट उरत नाही. यासाठी कांदा बियाण्यावर मोठ्या प्रमाणात 'एक्सपोर्ट सरचार्ज' लावला पाहिजे, ही मागणी देखील मान्य करण्यात आली आहे. तसेच कांद्याचा खरेदी भाव नुकताच वाढवून १५ रुपये ८० पैसे करण्यात आला आहे. तो आणखी कसा वाढवता येईल यावर चर्चा झाली. कांद्याच्या बियाणांवर निर्बंध असले, तरी कांद्याच्या निर्यातीवर (कांदा पाठवण्यावर) कोणतीही बंदी नाही, असे या चर्चेत स्पष्ट करण्यात आले.

नाफेड किंवा एनसीसीएफमध्ये ग्रेडिंगच्या नावाखाली माल निकृष्ट दर्जाचा दाखवून खरेदी नाकारली जाते, अशी शेतकऱ्यांची तक्रार असते. यावर उपाय म्हणून आता यंत्रसामुग्रीच्या माध्यमातून ग्रेडिंग केले जाईल, ज्यामुळे शेतकऱ्यांना योग्य न्याय मिळणार असल्याबाबत समाधान व्यक्त करून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, आंबा आणि हापूस आंब्यासंदर्भात निर्माण झालेल्या प्रश्नांबाबत केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान यांनाही यावेळी निवेदन देण्यात आले. विमा कंपन्यांनी घातलेल्या जाचक अटींमध्ये बदल केल्यास आंबा उत्पादकांना मोठा दिलासा मिळू शकतो, हे त्यांच्या निदर्शनास आणून दिले. यावर केंद्रीय मंत्र्यांनी विमा कंपन्यांची बैठक घेऊन योग्य मार्ग काढण्याचे आश्वासन दिले असल्याची माहितीही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली.


---

## थेट सरपंच पद्धतीमुळे गावागावात 'सुभेदार' तयार ; लोकशाहीवर घाला — देवव्रत पाटील शॅडो कॅबिनेट सदस्य मनसे

**दैनिक युवक आधार**

**अलिबाग निलेश फुंडे रेवदंडा प्रतिनिधी** : राज्यातील थेट सरपंच निवडणूक पद्धतीमुळे गावागावात सत्ताधाऱ्यांचे "सुभेदार" तयार होत असून ग्रामलोकशाही संपविण्याचा हा सुनियोजित डाव आहे, असा घणाघाती आरोप महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे शॅडो कॅबिनेट सदस्य देवव्रत विष्णू पाटील यांनी केला आहे. थेट सरपंच पद्धतीमुळे सामान्य नागरिकांचा सहभाग संपुष्टात येत असून पैसा, दबाव आणि राजकीय गॉडफादर यांच्या जोरावर ग्रामपंचायती ताब्यात घेण्याचे राजकारण सुरू असल्याचा गंभीर आरोपही त्यांनी केला.

रायगड जिल्ह्यातील तब्बल ३४० ग्रामपंचायतींची मुदत संपूनही निवडणुका रखडलेल्या आहेत. गेली अडीच वर्षे अनेक



ग्रामपंचायतींचा कारभार प्रशासन आणि सत्ताधारी नेत्यांच्या आशीर्वादाने सुरू असल्याचा दावा करत पाटील यांनी यावर तीव्र नाराजी व्यक्त केली. "ग्रामपंचायतींच्या निवडणुका वेळेत न घेणे आणि थेट सरपंच पद्धती कायम ठेवणे, हा लोकशाही कमकुवत करण्याचा प्रकार आहे," असे ते म्हणाले.

"पूर्वी गावातील सामान्य माणूस, सामाजिक कार्यकर्ता किंवा प्रामाणिक व्यक्ती सदस्यांच्या माध्यमातून सरपंचपदी पोहोचू शकत होती. मात्र आता थेट सरपंच निवडणुकीत संपूर्ण गावभर पैसा वाटण्याची ताकद असलेलाच उमेदवार निवडून येतो. त्यामुळे निवडणूक ही लोकशाहीची प्रक्रिया न राहता पैशांची स्पर्धा बनली आहे," असा आरोप त्यांनी केला.

आरक्षणामुळे एखादा सर्वसामान्य उमेदवार निवडणुकीत उभा राहिला तरी त्यामागे स्थानिक राजकीय 'सुभेदार' आणि पैशांची ताकद असते, असा दावा करत पाटील म्हणाले, "जो उमेदवार निवडणुकीत कोट्यवधी रुपये खर्च करतो, तो निवडून आल्यानंतर तो पैसा भ्रष्टाचारातून वसूल करणारच. अशा भ्रष्टाचाराला राजकीय गॉडफादरची साथ मिळते आणि हा गॉडफादर बहुतांश वेळा सत्ताधारी पक्षातीलच असतो."

थेट सरपंच पद्धती ही गावपातळीपासून राज्यातील सत्ता मजबूत ठेवण्यासाठी मुद्दाम राबविण्यात आलेली यंत्रणा असल्याचा आरोप करत त्यांनी म्हटले की, "गावागावात एकेक सुभेदार तयार करून भविष्यात ग्रामपंचायतींवर पूर्ण नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न सुरू आहे. त्यातून आमदारकी सुरक्षित ठेवणे आणि राज्यातील सत्ता हस्तगत करणे, हा यामागील खरा राजकीय हेतू आहे."

"ग्रामसभेची ताकद संपवून लोकशाहीची मुळे कमकुवत करणारी ही पद्धत तात्काळ बंद करावी. सरपंच निवड पुन्हा सदस्यांमधूनच व्हावी, जेणेकरून सामान्य, प्रामाणिक आणि सामाजिक बांधिलकी असलेल्या व्यक्तींना संधी मिळेल," अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने देवव्रत पाटील यांनी केली आहे.

---

## सावरकरांच्या विचारांवरच देशाची प्रगती; पनवेलचे महापौर नितीन पाटील यांचे प्रतिपादन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल(प्रतिनिधी) :** "ज्यांनी आपल्याला प्रखर राष्ट्रभक्ती आणि देशाभिमान शिकवला, तसेच जगण्याची शाश्वत अशी जीवनमूल्ये दिली, अशा स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या विचारांवरच आज संपूर्ण देश प्रगती करत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या नेतृत्वाखाली देशाची ही घोडदौड सुरू आहे, असे प्रतिपादन पनवेलचे महापौर नितीन पाटील यांनी केले. स्वातंत्र्यवीर सावरकर जयंतीनिमित्त शहरातील सावरकर चौक येथे आयोजित विशेष कार्यक्रमात ते बोलत होते.

पुढे बोलताना महापौर नितीन पाटील म्हणाले की, सावरकरांचे जीवन आणि त्यांचे विचार प्रत्येक भारतीयासाठी





प्रेरणादायी आहेत. त्यांनी दिलेली जीवनमूल्ये आजही तितकीच प्रासंगिक असून, देशहितासाठी ती अंगीकारणे गरजेचे आहे. कार्यक्रमाला मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद पाहून महापौरांनी उपस्थितांचे आभार मानले. "आपण सर्वजण अत्यंत उत्साहामध्ये या कार्यक्रमाला एकत्र जमलात, त्याबद्दल मी तुम्हा सर्वांचे मनःपूर्वक आभार मानतो," अशा शब्दांत त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली. भाषणाच्या शेवटी त्यांनी सर्वांना सावरकर जयंतीच्या पुनश्च शुभेच्छा देऊन 'जय हिंद, जय महाराष्ट्र'च्या घोषणांनी आपल्या भाषणाचा समारोप केला. या कार्यक्रमाला महिला व बालकल्याण सभापती ममता म्हात्रे, गणेश कडू, नगरसेवक अजय बहिरा,सुमित झुंजारराव, प्रिती जॉर्ज, स्नेहल ढमाले, केशवस्मृती पतपेढीचे चेअरमन अमित ओझे, अभिषेक पटवर्धन, भाजपचे शहर मंडळ उपाध्यक्ष केदार भगत, सरचिटणीस रूपेश नागवेकर, चिन्मय समेळ, अनिमेष ओझे, ॲड.प्रफुल्ल म्हात्रे, पतपेढीचे वरिष्ठ व्यवस्थापक महेंद्र गोडबोले, सुषमा भिडे, विनीता जोशी, स्वाती कोळी, ज्येष्ठ पत्रकार संजय कदम, विशाल सावंत, केशवस्मृती पतपेढीचे कर्मचारी, स्थानिक नागरिक, पदाधिकारी आणि सावरकरप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

## पनवेल वाहतूक पोलिसांसाठी निवारा केंद्र उपलब्ध करून देण्यासाठी पनवेल महानगर प्रेस क्लब चा पुढाकार

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी )** : आजच्या धावपळीच्या युगात.. वाढणारी वाहनांची वर्दळ... होणारी ट्रॅफिक.. आणि त्यावर नियंत्रण करण्याकरिता वाहतूक पोलीस हे नेहमीच उन्हात पावसात रस्त्यावरती आपलं कर्तव्य बजावत असतात.पण अश्या पनवेल वाहतूक कर्मचाऱ्यांना कर्तव्य बजावत असताना नवीन पनवेल येथील एच डी एफ सी चौकात निवारा केंद्र उपलब्ध करून देण्यासाठी पनवेल महानगर प्रेस क्लब ने पुढाकार घेतला असून या बाबत पनवेल वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर पाटील यांची भेट घेऊन परिस्थितीचा आढावा घेतला.

उन्हा-तान्हात, पावसात उभे राहून






आपल्या सुरक्षिततेसाठी आणि वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी ते अथक परिश्रम करत असतात. सततच्या वाहनांचा गोंगाट आणि प्रदूषणात काम केल्यामुळे ते शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या थकतात. इतरांप्रमाणेच त्यांनाही कुटुंब असते आणि सण-उत्सवांच्या दिवशीही ते ड्यूटीवर असल्यामुळे आपल्या कुटुंबापासून दूर असतात. त्यांच्याशी सौजन्याने आणि आदराने बोलल्यास तेही नागरिकांना नक्कीच मदत करतात. काही वेळा नियमांचे पालन न करणाऱ्यांवर कारवाई करणे हे त्यांच्या कर्तव्याचा भाग असतो.पनवेल महानगर प्रेस क्लब नेहमीच सामाजिक उपक्रम राबवित असते. त्याचाच एक भाग म्हणून वाहतूक पोलिसांन साठी निवारा केंद्र उभारण्यासाठी पनवेल महानगर प्रेस क्लब ने पुढाकार घेतला असून लवकरच निवारा केंद्र उपलब्ध करून देऊ असे आश्वासन या वेळी पनवेल महानगर प्रेस क्लब चे अध्यक्ष प्रशांत शेडगे यांनी प्रेस क्लबच्या माध्यमातून पनवेल वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर पाटील यांना दिले असून या वेळी पनवेल महानगर प्रेस क्लबचे सदस्य व ज्येष्ठ पत्रकार संजय कदम, सरचिटणीस राकेश पितळे, खजिनदार सचिन भोळे आणि इतर पोलीस कर्मचारी या वेळी उपस्थित होते.

---

## सरस्वती इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीत डिप्लोमा प्रवेशासाठी विद्यार्थ्यांची गर्दी

**दैनिक युवक आधार**

**रायगड प्रतिनिधी रणिता ठाकूर** : खारघर येथील सरस्वती इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी मध्ये डिप्लोमा (पॉलिटेक्निक) प्रथम वर्ष प्रवेश प्रक्रियेला विद्यार्थ्यांचा व पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून संस्थेमध्ये प्रवेशासाठी मोठ्या प्रमाणात गर्दी होताना दिसत आहे. विविध तांत्रिक अभ्यासक्रमांसाठी विद्यार्थ्यांनी उत्साहाने अर्ज सादर केले असून संस्थेच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणामुळे विद्यार्थ्यांचा कल वाढत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.संस्थेतील अत्याधुनिक शैक्षणिक सुविधा, अनुभवी प्राध्यापकवर्ग, प्रशस्त परिसर तसेच विद्यार्थीकेंद्रित शिक्षण पद्धतीमुळे पालक व विद्यार्थ्यांकडून संस्थेचे विशेष कौतुक होत आहे. प्रवेश प्रक्रियेदरम्यान विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन मिळावे यासाठी संस्थेमध्ये विशेष मार्गदर्शन केंद्राची व्यवस्था करण्यात आली असून आवश्यक माहिती व सहकार्य तत्परतेने दिले जात आहे.यावर्षीही विद्यार्थ्यांचे उज्ज्वल





भविष्य घडविण्याचा संस्थेचा निर्धार असल्याचे प्राचार्य डॉ. डी. आर. सुरोशे यांनी सांगितले. तसेच विद्यार्थ्यांनी वेळेत प्रवेश प्रक्रिया पूर्ण करून संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहनही संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

# कागलमधील सिद्धिविनायक सोसायटीचा कुटुंब स्नेहमेळा उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**
**कागल, प्रतिनिधी**:कोल्हापूर जिल्ह्यातील कागल तालुक्यातील मुजुमदार पार्क येथील सिद्धिविनायक सोसायटीमध्ये वास्तव्यास असलेल्या मराठी कुटुंबीयांचा कौटुंबिक स्नेहमेळा व संयुक्त स्नेहभोजन कार्यक्रम रविवार, दिनांक २५ मे २०२६ रोजी रात्री ८ ते १० या वेळेत उत्साहात संपन्न झाला.



महाराष्ट्रातील विविध गावांतून व शहरांतून येऊन येथे स्थायिक झालेली ३० ते ३५ कुटुंबीय या मेळाव्याला उपस्थित होती. श्री गणेश भुरे यांच्या टेरेसवर या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाची सुरुवात सर्वांच्या ओळख परिचयाने झाली. त्यानंतर वर्षभरातील कामाचा आढावा, गप्पागोष्टी, विनोद यात सर्वजण रमले. शेवटी सर्वांनी एकत्रित स्नेहभोजनाचा आस्वाद घेतला.

या स्नेहमेळ्याचे आयोजन सोसायटीचे अध्यक्ष श्री प्रकाश गिरी, सल्लागार श्री दिलीप गाडेकर, सेवानिवृत्त आयपीएस शामराव कदम, ठेकेदार गणेश भुरे, अक्षय शहा, प्रवीण जाधव व बने काका यांनी पुढाकार घेऊन केले होते.महिला पदाधिकारी सौ. पूजा शहा, कोमल भुरे, रूपाली वडर व डॉ. प्रियंका कांबळे यांनीही कार्यक्रमात सक्रिय सहभाग नोंदवला.

कुटुंबांमध्ये विचारांची देवाणघेवाण व्हावी, ओळख वाढावी व सोसायटीच्या पुढील कामाची दिशा ठरावी हा या स्नेहमेळयामागील मुख्य हेतू होता.

कार्यक्रमाचे स्वागत अध्यक्ष प्रकाश गिरी यांनी केले तर आभार सल्लागार दिलीप गाडेकर यांनी मानले.

# उदगीर शहरातील जाणाऱ्या दोन राष्ट्रीय महामार्गाचे लवकरच होणार रुंदीकरण

**दैनिक युवक आधार**
**उदगीर बालाजी तेलगे प्रतिनिधी** : उदगीर ते देगलूर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 63आणि नांदेड कंधार जळकोट उदगीर कमलनगर हा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 50 हे दोन्ही महामार्ग उदगीर नगर परिषद हद्दीतून जातात. शहरातून जाणाऱ्या या दोन्ही राष्ट्रीय महामार्ग रुंदीकरण करण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. त्यामुळे उदगीर शहरात येत्या काही दिवसांत राष्ट्रीय महामार्ग रस्ते रुंदीकरण मोहीम राबविण्यात येणार असल्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत.



लातूर जिल्ह्यातील उदगीर हे महाराष्ट्र व कर्नाटक व आंध्र प्रदेश सीमेवरील औद्योगिकदृष्ट्या सर्वत महत्त्वाचे शहर आहे. उदगीर शहरातून दोन राष्ट्रीय महामार्ग जातात. नगरपरिषद हद्दीबाहेर राष्ट्रीय महामार्गाचे रस्ते रुंद आहेत. परंतु शहरातील राष्ट्रीय महामार्ग रस्ते अतिशय अरुंद आहेत. राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक व वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढलेली आहे. शहरातून दोन राष्ट्रीय महामार्ग जात असले .तरी या शहरातील महामार्गावर सर्वत्र अतिक्रमण मोठ्या प्रमाणावर झालेले आहे. त्यामुळे शहरातील मुख्य चौकात वारंवार वाहतुकीची कोंडी निर्माण होत असते. परिणामी नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

नांदेड-कंधार-जळकोट-उदगीर-कमलनगर हा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 50 हा शहरातील जळकोट नाका, कॅप्टन कृष्णकांत कुलकर्णी चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक ते बीदर रोड असा जातो. या मार्गा वरील शहरातील मुख्य रस्ता अतिशय अरुंद आहे.

तर रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण दिसून येतात.तर -नळेगाव मार्गावर-उदगीर-देगलूर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 63 हा शहरातील डॉ. झाकीर हुसेन चौक, जय जवान चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक कृष्णकांत कुलकर्णी चौक ते देगलूर रोड असा जातो. शहरातील या महामार्गाची रुंदी वाढविण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. त्यामुळे येत्या काही दिवसांत उदगीर नगरपालिकेच्या वतीने शहरातील दोन्ही राष्ट्रीय महामार्गांचे रुंदीकरण मोहीम सुरू होण्याची शक्यता आहे.

**शहराबाहेरून राष्ट्रीय महामार्गाचे वळण रस्ते कधी होणार?**

उदगीर शहर हे दोन राष्ट्रीय महामार्गाने जोडले गेले आहे. परंतु दोन्ही राष्ट्रीय महामार्ग शहरातून जातात. शहरातील रस्ते अरुंद असल्याने आणि वाहतूक व वाहनांची संख्या वाढल्याने रहदारीस अडथळा निर्माण होत आहे. या दोन्ही राष्ट्रीय महामार्गांचे वळण रस्ते होणे अत्यंत आवश्यक आहे. उदगीर शहरा बाहेरून राष्ट्रीय महामार्गाचे वळण रस्ते करण्याची मागणी होत आहे.

**राष्ट्रीय महामार्गाची रुंदी किती? पालिकेने माहिती मागविली !**

उदगीर शहरातून जाणारे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 50 आणि राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 63 या महामार्ग रस्त्यांची रुंदी उदगीर नगर परिषद हद्दीपर्यंत किती आहे. याबाबत उदगीर नगरपालिकेच्या वतीने लातूर व नांदेड या राष्ट्रीय महामार्ग विभागाकडे माहिती मागविण्यात आली आहे. उदगीर नगर परिषदेची सुधारित विकास योजना मंजूर आहे. त्यामुळे लवकरच शहरातील राष्ट्रीय महामार्गांचे रुंदीकरण सुरू होणार असल्याचे समजते.

# मेंडका येथील प्रकाश निखाते व ऋषिकेश सुदेवाड यांची मुंबई पोलीस दलात निवड

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी : प्रकाश गवारे :** अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करत जिद्द, मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर प्रकाश भास्करराव निखाते यांनी मुंबई पोलीस दलात निवड मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले आहे. तसेच मेंडका येथील ऋषिकेश बालाजी सुदेवाड यांचीही मुंबई पोलीस दलात निवड झाल्याने परिसरातून दोघांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



प्रकाश निखाते यांचा जीवनप्रवास संघर्षमय असून अनेक तरुणांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. सन २००७ मध्ये त्यांच्या वडिलांचे निधन झाले. त्यानंतर अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत आई व मोठ्या भावाने कुटुंबाची जबाबदारी सांभाळत सर्व भावांना शिक्षण दिले. लहानपणी जंगलातून डोक्यावर मोळ्या आणून त्या विकून दोन वेळच्या जेवणाची सोय करत त्यांनी शिक्षणाची वाटचाल सुरू ठेवली.

सन २०१६ मध्ये त्यांचे मोठे बंधू शिलवंत भास्करराव निखाते यांची नांदेड पोलीस दलात नियुक्ती झाली. त्यानंतर २०१९ मध्ये बारावी पूर्ण करताच प्रकाश निखाते यांची गृहरक्षक दलात निवड झाली. त्याच वर्षी RPF भरतीमध्ये केवळ एका गुणाने त्यांना प्रतीक्षा यादीत राहावे लागले. पुढे कोरोना काळात २०२० ते २०२२ दरम्यान त्यांनी गृहरक्षक दलात प्रामाणिकपणे सेवा बजावली.

दरम्यान, २०२३ मध्ये मुंबई पोलीस भरतीत दोन गुणांनी तर २०२४-२५ च्या भरतीत एका गुणाने प्रतीक्षा यादीत राहूनही त्यांनी हार मानली नाही. अखेर २०२५-२६ च्या मुंबई पोलीस भरती प्रक्रियेत SC होमगार्ड प्रवर्गातून द्वितीय क्रमांकाने त्यांची निवड झाली.

"संघर्ष, जिद्द आणि सातत्य असेल तर यश निश्चित मिळते," हे प्रकाश निखाते यांनी आपल्या यशातून सिद्ध करून दाखवले आहे. त्यांच्या या यशामुळे परिसरातील तरुणांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून अनेकांसाठी ते प्रेरणास्थान ठरत आहेत.

दरम्यान, मेंडका येथील ऋषिकेश बालाजी सुदेवाड यांनी पहिल्याच प्रयत्नात मुंबई पोलीस भरतीत यश संपादन करून गावाचे नाव उज्ज्वल केले आहे. त्यांच्या या यशाबद्दलही सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. मुंबई पोलीस दलात निवड झाल्याबद्दल प्रकाश भास्करराव निखाते व ऋषिकेश बालाजी सुदेवाड यांच्यावर सर्व स्तरातून शुभेच्छांचा वर्षाव होत असून त्यांच्या पुढील सेवाकाळासाठी मंगलमय शुभेच्छा व्यक्त करण्यात येत आहेत.

# रहिमाबाद शिवारात भीषण आग; गोठ्यासह ५ जनावरे खाक लाखो रुपयांचे नुकसान; सांडू पाडळे यांचा संसार उघड्यावर

दैनिक युवक आधार
छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी : रहिमाबाद येथील शेत शिवारातील गट नंबर ५३ मधील गरीब शेतकरी सांडू धोंडीबा पाडळे यांच्या पत्र्याच्या शेडला (गोठ्याला) बुधवारी (ता. २७) रात्रीच्या सुमारास अचानक भीषण आग लागली. या आगीत गोठ्यात बांधलेला एक गोऱ्हा व चार शेळ्यांचा तडफडून दुर्दैवी मृत्यू झाला. तसेच शेती साहित्य, धान्य व संसारोपयोगी वस्तू जळून खाक झाल्याने पाडळे यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. या घटनेमुळे पाडळे कुटुंबाचा संपूर्ण संसार उघड्यावर आला आहे.



रहिमाबाद येथील अल्पभूधारक शेतकरी सांडू पाडळे हे मोलमजुरी करून आपला उदरनिर्वाह करतात. गावातील घर लहान असल्याने त्यांनी शेती साहित्यासह आपला अर्ध्याहून अधिक संसार याच पत्र्याच्या शेडमध्ये ठेवला होता. बुधवारी रात्री आठ ते दहाच्या सुमारास या बंद शेडला अचानक आग लागली. रात्रीच्या वेळी शेतात कोणी नसल्याने आगीने अल्पावधीतच रौद्ररूप धारण केले.

आगीची तीव्रता एवढी भीषण होती की, शेडमध्ये बांधलेल्या मुक्या जनावरांना बाहेर काढण्याची संधीही मिळाली नाही व ती आतच तडफडून दगावली. याशिवाय शेडमध्ये साठवून ठेवलेल्या गव्हाच्या ११ ते १२ गोण्या, शेतीसाठी आणलेला ठिबक सिंचनाचा संच, पीव्हीसी पाईप, शेतीची अवजारे आणि घरगुती जीवनावश्यक साहित्य जळून कोळसा झाले. डोळ्यांदेखत कष्टाची कमाई आणि हक्काचा आसरा जळताना पाहून पाडळे आणि त्यांच्या कुटुंबातील महिलांनी ओक्साबोक्शी टाहो फोडला. हे हृदयद्रावक दृश्य पाहून उपस्थित ग्रामस्थांनाही आपले अश्रू अनावर झाले होते.

घटनेची माहिती मिळताच शिवसेना संघटक सुभाष नवल आणि शिवसेना शाखाप्रमुख नागेश नवल यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेऊन पीडित कुटुंबाचे सांत्वन केले. सांडू पाडळे यांना शासनाकडून त्वरित आणि जास्तीत जास्त नुकसानभरपाई मिळवून देण्यासाठी महसूल प्रशासनाकडे सर्वतोपरी पाठपुरावा केला जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.यावेळी शेतकरी विश्वनाथ बनगाळे, नाना राऊत, विष्णू बोडखे यांच्यासह परिसरातील ग्रामस्थ व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. महसूल विभागाने तात्काळ पंचनामा करून या गरीब कुटुंबाला आर्थिक दिलासा द्यावा, अशी मागणी परिसरातील शेतकऱ्यांमधून होत आहे.

# शेख फरीद वझरा येथे बकरी ईद उत्साहात संपन्न




**दैनिक युवक आधार**
**श्रीक्षेत्र माहूरगड प्रतिनिधी /सय्यद इसा** : बंधुभाव शांतता आणि मानवतेचा संदेश देणारा पवित्र सण म्हणजे बकरी ईद( ईद-उल -अजहा) पवित्र सना निमित्त सर्व वझरा गावातील मुस्लिम समुदायाने मिळून हजरत ख्वाजा शेख फरीद शखरगंज दर्गाह येथे जाऊन ईदची नमाज अदा केली हाफिज मौलाना खालीक रजा यांनी नमाज पठण करून देशात शांतता आणि सुव्यवस्था सामाजिक सलोखा असावा यासाठी सर्वांनी अल्लाहाकडे प्रार्थना केली सर्वांनी एकमेकांना आलिंगन देऊन ईदच्या शुभेच्छा दिल्या.

# परंतू रेतीच्या वाहनांना डिझेलचा साठा कुठून उपलब्ध?

**दैनिक युवक आधार**
**तालूका प्रतिनिधी महादेव उप्पे** : देगलूर(दि.२७) मागील काही दिवसांपासून पेट्रोल पंपावर डिझेलचा तुटवडा निर्माण झाल्यामुळे व तीन ते चार दिवसाला एकदा डिझेलची गाडी उपलब्ध होत असल्यामुळे पेट्रोल पंपावर वाहनांच्या रांगा लागल्या आहेत.शेतकऱ्यांच्या शेतीच्या मशागतीसाठी पेट्रोल डिझेलचा तुटवडा निर्माण झाला असून,शेतकऱ्यांना प्रत्येक समस्यांना सामोरे जावे लागत आहे.देगलूर तालुक्यातील मौजे हणेगाव येथे दोन पेट्रोलपंप असून इंडियन पेट्रोल पंप येथे मागील सहा ते सात दिवसांपासून डिझेल उपलब्ध नाही तर हिंदुस्थान पेट्रोल पंप येथे एक दिवस आड एक दिवसाला डिझेलचे वाहन येत आहे.



अशा परिस्थितीमध्ये कुणालाच अडचण होऊ नये याची खबरदारी घेत प्रत्येकाला दोन हजार रुपयांहून अधिक डिझेल कुणालाही न देता ग्राहकाची गैरसोय होऊ नये याची खबरदारी मरखेल पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक रविंद्र हुंडेकर व त्यांच्या सहकाऱ्यांकडून घेण्यात आली.परंतू सगरोळी ते कर्नाटक राज्यांत दिवस रात्र चालणाऱ्या शंभर ते दिडशे रेतीच्या वाहनांना डिझेलची कमतरता नसल्यामुळे या रेतीच्या वाहनांना ब्रेकच लागत नाही मग हे डिझेल कुठून उपलब्ध होतंय?प्रत्येक वाहनांना दररोज दोनशे ते तीनशे लिटर डिझेल लागत आहे,मग हे डिझेल कुठून उपलब्ध करून दिली जाते? शेतकऱ्यांच्या शेतीच्या मशागतीपेक्षा रेतीच्या गाड्यांना डिझेल उपलब्ध करून देणे गरजेचे आहे काय?शेतकऱ्यांचे वाहने पेट्रोलपंपावर तीन तीन तास रांगेत उभे राहावे अनं रेतीच्या वाहनांना तात्काळ डिझेल मिळणे हे कुठले नियम आहे?भारत देश हा कृषीप्रधान देश असून दिवसेंदिवस कृषीप्रधान देशात शेतकऱ्यांना जगने कठीण होत चालले आहे असे प्रश्न शेतकऱ्यांमध्ये निर्माण झाले आहे.

# ठाणे पोलीस दलात सतीश पवार यांची निवड; मित्रपरिवाराकडून उत्साहात सत्कार

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी : प्रकाश गवारे** : खुजडा येथील सतीश पवार यांची ठाणे पोलीस दलात निवड झाल्याने गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल सर्वत्र कौतुक होत असून, वर्गमित्र व मित्रपरिवाराच्या वतीने त्यांचा उत्साहात सत्कार करण्यात आला.




या सत्कार सोहळयावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मुदखेड येथील नामफलकाला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर सतीश पवार यांचा पुष्पहार व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या परिश्रम, जिद्द आणि चिकाटीचे कौतुक करत, भविष्यातही त्यांनी प्रामाणिकपणे कर्तव्य पार पाडावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.सतीश पवार यांनी आपल्या यशामागे आई-वडील, शिक्षक व मित्रपरिवार यांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य असल्याचे नमूद करत, हे यश आई-वडील, भाऊ-बहीण व मित्रपरिवारालाच अर्पण करत असल्याचे भावनिक उद्गार काढले. या कार्यक्रमास गावातील तरुण, मित्रपरिवार व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सतीश पवार यांच्या या यशामुळे इतर तरुणांनाही प्रेरणा मिळत असून, त्यांच्या पुढील वाटचालीस सर्वांनी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.उपस्थित मान्यवर : सुरज चौदंते, कपिल हटकर, पत्रकार अजय कांबळे, उदय साळवे, टिनु चौदंते, दर्शन चौदंते, सुशांत कदम, शंकर चौदंते, रोहित वाघमारे व इतर मित्रपरिवार.

# बकरी ईद उत्साहात साजरी; हिंदू-मुस्लिम बांधवांच्या एकोप्याचा आदर्श

**दैनिक युवक आधार**
**बीड आष्टी प्रतिनिधी मारुती सत्रे** : आष्टी तालुक्यातील धामणगाव व सांगवी पाटण येथे बकरी ईद उत्साहात साजरी करण्यात आली. या निमित्ताने मुस्लिम बांधवांनी नमाज पठण करून ईदची बकरी साजरी केली. तर हिंदू-मुस्लिम बांधवांनी एकमेकांच्या गळाभेटी घेत शुभेच्छांची देवाणघेवाण केली.

या भागात दीपावली, दसरा, अखंड हरिनाम सप्ताह, यात्रा, रमजान ईद असे सर्व धार्मिक सण हिंदू-मुस्लिम बांधव एकत्र येऊन साजरे करतात आणि एकोप्याचा संदेश देतात. 'माणुसकी हीच जात आणि मानवता हाच धर्म' हे मानून सर्वजण गुण्यागोविंदाने राहतात.

**बकरी ईदच्या शुभेच्छा देण्यासाठी**



**यावेळी उपस्थित मान्यवरांमध्ये प्रमुख होते:**

. भागवताचार्य काशिनाथ महाराज शास्त्री
· मा. जि. प. अध्यक्ष विजय गोल्हार
· आष्टी तालुका दूध संघाचे मा. चेअरमन संजय गाढवे
. ए.पी.आय विक्रांत हिंगे
· सरपंच मनोज गाढवे
. सरपंच दत्तात्रय खोटे
· उपसरपंच सतीश झिंजुर्के
· उपसरपंच डॉ. अकिल सय्यद
· ज्ञानेश्वर भोसले,पत्रकार नितीन कांबळे, पत्रकार दादा पवळ,संदीप राऊत, इस्लाम सय्यद, शहाबुद्दीन सय्यद, साजिद पटेल, आलम शेख, बबलू सय्यद, बाबर शेख, मुन्ना शेख, अजहर शेख, फारुक शेख, नदीम शेख, अमजद बागवान, अफसर बागवान, युनुस बागवान, दादामिया पठाण, अब्बास पठाण,बादशहाभाई शेख, हुसेनभाई शेख, बशीरभाई शेख, सद्दाम शेख, अन्सार शेख, फारुख शेख, युनुस शेख, शाहरुख शेख , व शिवरायांचा मावळा समीर शेख, पोलीस कर्मचारी, सर्व हिंदू मुस्लिम बांधव उपस्थित होते.जगभरात बकरी ईद उत्साहात साजरी होत असतानाच धामणगाव व सांगवी पाटण येथील हा हिंदू-मुस्लिम एकोप्याचा आदर्श इतरांसाठी प्रेरणादायी ठरला.

# रायगडच्या मातीतून महिला क्रिकेटचा नवा आवाज!

## तब्बल पहिल्यांदाच महिला टी-२० प्रीमियर लीगचा जल्लोष; ग्रामीण भागातील मुलींना मिळाले मोठे व्यासपीठ

**दैनिक युवक आधार**

**निलेश फुंडे रेवदंडा** : रायगड जिल्ह्यात क्रिकेटची परंपरा जुनी... गावोगावी टेनिस बॉलपासून ते मोठमोठ्या स्पर्धांपर्यंत पुरुष क्रिकेटचा गाजावाजा कायमच होत आला. मात्र, महिला क्रिकेटपटूंच्या वाट्याला अनेकदा केवळ सराव, कौतुकाची थाप आणि मर्यादित संधीच आल्या. जिल्ह्यातील असंख्य प्रतिभावान मुलींकडे गुणवत्ता असूनही त्यांना संघटित, व्यावसायिक आणि स्पर्धात्मक व्यासपीठ मिळत नव्हते. अखेर २०२६ हे वर्ष रायगडच्या महिला क्रिकेटसाठी ऐतिहासिक ठरले असून रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या पुढाकारातून जिल्ह्यात प्रथमच महिला टी-२० प्रीमियर लीग स्पर्धेला दिमाखात सुरुवात झाली आहे.

गव्हाण-उलवे येथील छत्रपती शिवाजी महाराज मैदानावर बुधवारी (दि.२८) उत्साहपूर्ण वातावरणात स्पर्धेचा शुभारंभ करण्यात आला. मैदानावर रंगीबेरंगी जर्सी परिधान केलेल्या महिला क्रिकेटपटूंमध्ये आत्मविश्वास, उत्साह आणि मोठे स्वप्न पाहण्याची जिद्द स्पष्टपणे दिसून येत होती. अनेक मुलींसाठी ही केवळ स्पर्धा नसून स्वतःला सिद्ध करण्याची आणि रायगडच्या सीमारेषा ओलांडून राज्यस्तरावर झेप घेण्याची सुवर्णसंधी ठरत आहे.

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील यांनी सांगितले की, "रायगड जिल्ह्यातील उत्कृष्ट आणि उदयोन्मुख



महिला क्रिकेटपटूंना एकत्र आणून त्यांना मोठ्या व्यासपीठावर खेळण्याची संधी मिळावी, हा या स्पर्धेमागील प्रमुख उद्देश आहे. महिला क्रिकेटला चालना देत भविष्यात रायगडचा सक्षम महिला क्रिकेट संघ तयार करण्याच्या दिशेने हे महत्त्वाचे पाऊल आहे."

आजवर अनेक मुली शालेय स्पर्धा, स्थानिक सामने किंवा मर्यादित क्रिकेट उपक्रमांमध्येच अडकून पडल्या होत्या. मात्र आता 'प्रीमियर लीग'च्या धर्तीवर होणाऱ्या या स्पर्धेमुळे त्यांना व्यावसायिक क्रिकेटचा अनुभव मिळणार आहे. मैदानावरील स्पर्धात्मक वातावरण, गणवेश, पंच, स्कोअरर्स, लाइव्ह प्रक्षेपण आणि संघ व्यवस्थापन यामुळे महिला क्रिकेटपटूंमध्ये नवा आत्मविश्वास निर्माण होत असल्याचे चित्र उद्घाटन सामन्यावेळी पाहायला मिळाले.

स्पर्धेत समीरा हॅबिटेटेस अलिबाग जेट्स, खोपोली क्रिकेट असोसिएशन, अभि इलेव्हन अलिबाग आणि चॅम्पियन्स क्रिकेट अकॅडमी खारघर या चार संघांचा समावेश करण्यात आला आहे. साखळी आणि बाद फेरी पद्धतीने खेविण्यात येणाऱ्या या स्पर्धेत चुरशीच्या लढती पाहायला मिळणार असून जिल्ह्यातील क्रिकेटप्रेमींमध्येही उत्सुकतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

विशेष म्हणजे स्पर्धेत सहभागी सर्व महिला खेळाडूंना रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या वतीने आकर्षक रंगीत गणवेश देण्यात आले आहेत. तसेच संपूर्ण स्पर्धेचे यूट्यूबवर लाइव्ह प्रक्षेपण होणार असल्याने ग्रामीण भागातील महिला क्रिकेटपटूंना प्रथमच डिजिटल व्यासपीठावर झळकण्याची संधी मिळणार आहे. रायगडमधील नामवंत महिला खेळाडूंसह महाराष्ट्र संघात निवड झालेल्या खेळाडूंचाही या स्पर्धेत सहभाग असल्याने स्पर्धेची गुणवत्ता आणखी उंचावली आहे.

उद्घाटनप्रसंगी आरडीसीएचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील, उपाध्यक्ष राजेश पाटील, सहसचिव जयंत नाईक, सदस्य अरुण शिंदे, देवेंद्र पाटील, अभिजित तुळपुळे, मनोहर अहिर, छत्रपती शिवाजी महाराज क्रिकेट अकॅडमीचे अध्यक्ष अमित कडू, सुजित ठाकूर, विनय पाटील तसेच पंच, स्कोअरर्स, महिला खेळाडू आणि मोठ्या संख्येने क्रिकेटप्रेमी उपस्थित होते.

महिला क्रिकेटला नवे व्यासपीठ देणाऱ्या या स्पर्धेमुळे रायगडच्या ग्रामीण भागातील अनेक मुलींची क्रिकेटची स्वप्ने आता प्रत्यक्ष मैदानावर उतरू लागली आहेत. "क्रिकेट हे फक्त मुलांचे क्षेत्र नाही, आम्हीही मोठे सामने जिंकू शकतो," असा आत्मविश्वास या स्पर्धेच्या निमित्ताने रायगडच्या कन्यांमध्ये निर्माण होताना दिसत आहे. रायगड जिल्ह्याच्या क्रीडा इतिहासात महिला क्रिकेटचा हा नवा अध्याय भविष्यात अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय खेळाडू घडविणारा ठरू शकतो, अशी आशादेखील आता व्यक्त होत आहे.

## शेतातील पाणी शेतात मुरविण्यासाठी शेतकऱ्यांनी पुढाकार घेण्याची आवश्यकता - जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद

**दैनिक युवक आधार**

**नागपूर प्रतिनिधी राकेश यादव** : अल-निनोमुळे यावर्षी पावसाचे प्रमाण कमी होणार असल्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. अल-निनोसमवेत युध्दामुळे रासायनीक खते व निविष्ठांबाबत आव्हानात्मक परिस्थिती निर्माण झाली आहे. या परिस्थितीतून सावरण्यासाठी नैसर्गिक, सेंद्रीय खते व निविष्ठांवर अधिक भर देऊन शेतकऱ्यांनी आपल्या बांधावर पडणाऱ्या प्रत्येक थेंबाला शेतातच अडविण्यासाठी बांध बंदिस्ती आणि सरीवरंबा पध्दतीने शेत करण्याला प्राधान्य द्यावे असे आवाहन जिल्हाधिकारी कुमार



आशीर्वाद यांनी केले.

किन्ही येथे आत्मामार्फत प्रोत्साहन देऊन साकारलेल्या दीपस्तंभ फार्मर्स प्रोड्युसर कंपनीला भेट देऊन शेतकऱ्याशी त्यांनी संवाद साधला. या केंद्रामार्फत 25 शेतकऱ्यांचे गट संलग्न असून सुमारे 500 हेक्टर शेती ही नैसर्गिक आणि सेंद्रीय पध्दतीने करण्यास शेतकऱ्यांनी प्राधान्य दिले आहे. यासाठी लागणारे गांडूळ खत, ट्रायकोडर्मा, दशपर्णी, जीवांमृत आदी विविध प्रकारच्या सेंद्रीय खतांचे उत्पादन या केंद्रात केले जाते.

कुही तालुक्यातील बारवा गावात त्यांनी सरीवरंबा पध्दतीने लागवड करण्यासाठी बेडमेकर यंत्राची पाहणी केली. एका दिवसात या यंत्राद्वारे सुमारे 3.5 एकर शेतीमध्ये बेडनिर्मिती केली जाते. यात तांत्रीकदृष्टया अधिक सुलभता येऊ शकेल यादृष्टीने जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधला.

भविष्यात पाण्याचे संकट टाळण्यासाठी व्यापक प्रमाणात आपल्याला पाण्याच्या बचतीसाठी प्रयत्न करावे लागणार आहे. सरीवरंबा पध्दतीतून शेतातले पाणी शेतात मुरण्यास मदत होते. पाण्याचा पडलेला ताण या पध्दतीतून पिकांना कमी प्रमाणात होतो असे त्यांनी सांगितले. या भेटीत त्यांनी गावातील पाणंद रस्ते, जलजीवन आदी कामांचा आढावा घेतला.

## न्यू इंग्लिश स्कूलमध्ये ईट प्ले रीड अभियानाचा जागर; विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी** : निरोगी आहार, खेळाचा आनंद आणि वाचनाची ओढ या त्रिसूत्रीद्वारे मुलांचा सर्वांगीण विकास साधण्याच्या उद्देशाने कार्यरत असलेल्या 'ईट प्ले रीड' या सामाजिक संस्थेमार्फत न्यू इंग्लिश स्कूल, गोविंदराव निकम येथे जनजागृती अभियान राबविण्यात आले. अपर्णा शहा यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या उपक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

दैनंदिन जीवनात सकस आहार, शारीरिक व्यायाम आणि वाचन संस्कृतीचे महत्त्व पटवून देण्यासाठी



संस्थेच्या राजदूतांनी शाळेला भेट दिली. यावेळी ईट प्ले रीड टीमच्या वतीने विद्यार्थी, शिक्षकांसाठी एका विशेष सादरीकरणाचे आयोजन करण्यात आले होते. संतुलित जीवनशैली कशी राखावी, सकस आहारामुळे शरीराला होणारे फायदे आणि वाचनामुळे विचारांमध्ये होणारा सकारात्मक बदल यावर यावेळी मार्गदर्शन करण्यात आले. हा संदेश मुलांच्या मनावर बिंबावा यासाठी संस्थेच्या वतीने विद्यार्थ्यांना आकर्षक प्लेकार्ड्स व विशेषतः तयार केलेल्या डायऱ्यांचे वाटप करण्यात आले. या साहित्यामुळे मुलांना त्यांच्या प्रगतीची आणि आरोग्याची नोंद ठेवण्यास मदत होणार आहे. ग्रामीण भागातील शाळांमध्ये अशा नाविन्यपूर्ण उपक्रमांची अनेकदा कमतरता भासते. हीच गरज ओळखून ईट प्ले रीडने या शाळेची निवड केली. संसाधनांची कमतरता असलेल्या भागातील मुलांपर्यंत पोहोचून त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी संस्थेने दाखवलेली ही वचनबद्धता कौतुकास्पद ठरत आहे. अपर्णा शहा यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या या विधायक कार्याला समाजातून मोठ्या प्रमाणावर पाठिंबा मिळत आहे.

## नेरे ते दुंद्रे विभागातील जीर्ण झालेले विद्युत खांब बदलण्याची मागणी

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी** : नेरे ते दुंद्रे भागात विद्युत पुरवठा कमी जास्त दाबाने होत असून या ठिकाणी जीर्ण झालेले विद्युत खांब बदलून नवीन खांब बसवण्याची मागणी शिवसेना शिंदे गटाचे पनवेल तालुका उपप्रमुख विश्वास पाटील आणि नेरे विभाग प्रमुख विद्याधर चोरघे यांनी महावितरण कडे केली आहे.नेरे ते दुंद्रे विभागात दररोज विद्युत पुरवठा खंडित होऊन विद्युत पुरवठा कमी जास्त दाबाने होत आहे. त्यामुळे विद्युतधारकांचे फॅन, टीव्ही, फ्रीज, वाय-फाय, बल्ब यांचे नुकसान होत आहे. तसेच मौजे शिवणसई तर्फे आंबे, आंबेवाडी या गावांमध्ये विजेची समस्या मोठ्या प्रमाणात आहे. वारंवार विद्युत पुरवठा खंडित होणे आणि कमी जास्त दाबाने होणे त्यामुळे नागरिक वैतागले आहेत. या ठिकाणी एकच ट्रांसफार्मर असल्याने त्यावर मोठ्या प्रमाणात लोड आहे. या ट्रान्सफार्मर वरून तामसई आणि वाजे गावाला विद्युत पुरवठा केला जातो. फार्म हाऊस चालकांना देखील येथूनच विद्युत पुरवठा होत असल्याने इतरत्र होणारा विद्युत पुरवठा बंद करावा जेणेकरून शिवणसई, आंबे,



आंबेवाडी या गावांना सुरळीत विद्युत पुरवठा होईल तसेच वाजे आणि तामसई गावासाठी वेगळ्या ट्रान्सफॉर्मरची व्यवस्था करावी. शिवणसई-आंबे परिसरात 40 वर्षांपूर्वी बसवलेले विद्युत खांब जीर्ण झालेले आहेत. पावसाळ्यात हे खांब खाली पडून दुर्घटना होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. त्यामुळे ते खांब पावसाळ्यापूर्वी बदलून घ्यावेत अशी मागणी करण्यात आली.

## सिल्लोडमध्ये बकरी ईद उत्साहात; आमदार अब्दुल सत्तार यांच्या शुभेच्छा

### मुख्य ईदगाह मैदानावर नमाज पठण; अधिकारी व मान्यवरांची स्वागत कक्षात सदिच्छा भेट

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी छत्रपती संभाजीनगर** : बकरी ईदचा सण अत्यंत उत्साहपूर्ण आणि पारंपरिक धार्मिक सलोख्याच्या वातावरणात साजरा करण्यात आला. येथील मुख्य ईदगाह मैदानावर सकाळी ८ वाजता हजारो मुस्लिम बांधवांनी एकत्र येत पवित्र ईदची नमाज अदा केली. नमाजनंतर आमदार अब्दुल सत्तार, नगराध्यक्ष अब्दुल समीर आणि जिल्हा परिषद सदस्य अब्दुल आमेर यांनी उपस्थित सर्व नागरिकांना बकरी ईदच्या मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. दिवसभर शहरात सर्वधर्मीय बांधवांनी एकमेकांची गळाभेट घेत सामाजिक ऐक्याचा संदेश दिला.







या सणानिमित्त नगर परिषदेच्या वतीने स्वच्छता, पाणीपुरवठा व वाहतुकीची चोख व्यवस्था राखण्यात आली होती.

मैदानावर उभारण्यात आलेल्या नगर परिषदेच्या स्वागत कक्षात आमदार अब्दुल सत्तार व नगराध्यक्ष अब्दुल समीर यांना सदिच्छा देण्यासाठी प्रशासकीय अधिकारी आणि लोकप्रतिनिधींची मांदियाळी जमली होती. यात परिविक्षाधीन उपजिल्हाधिकारी तथा तहसीलदार अंकिता ताकभाते, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. दिनेशकुमार कोल्हे, पोलीस उपाधीक्षक आरती पवार, पोलीस निरीक्षक शेषराव उदार, मंडळ अधिकारी रुख्मिण माने, काशिनाथ ताठे, जिल्हा बँकेचे चेअरमन अर्जुन पाटील गाढे, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष श्रीराम महाजन, जिल्हा परिषद सदस्य देविदास पालोदकर, उपनगराध्यक्ष विठ्ठल सपकाळ, नगर परिषदेतील शिवसेना गटनेते सुधाकर पाटील, कृउबा समितीचे संचालक तथा नगरसेवक नंदकिशोर सहारे, कृउबा समितीचे संचालक सतीश ताठे, नगरसेवक रऊफ बागवान, सिद्धेश्वर आहेर, विशाल जाधव, शंकरराव खांडवे, राजेंद्र ठोंबरे, प्रशांत क्षीरसागर, राजू गौर, संजय डमाळे, डॉ. विठ्ठल जाधव, गणेश डोईफोडे, कुणाल सहारे, विनोद काटकर, गजानन चाथे आणि सुनील दुधे यांच्यासह शिवसेना व विविध पक्षांचे पदाधिकारी, अधिकारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सदिच्छा भेट: सिल्लोड येथे बकरी ईदनिमित्त आमदार अब्दुल सत्तार व नगराध्यक्ष अब्दुल समीर यांना शुभेच्छा देताना तहसीलदार अंकिता ताकभाते, डॉ. दिनेशकुमार कोल्हे, आरती पवार, शेषराव उदार, अर्जुन पाटील गाढे, श्रीराम महाजन व इतर मान्यवर.

## अकोट आत्मा अंतर्गत नैसर्गिक शेतीशाळेचे आयोजन !!

**दैनिक युवक आधार**

**दिलीप कराळे/आकोट प्रतिनिधी** : कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) अकोट अंतर्गत अकोलखेड ता.अकोट येथे बुधवार दिनांक २७/०५/२०२६ रोजी नैसर्गिक शेतीशाळा बाब अंतर्गत तूर पिकाची शेतीशाळेच्या पहिल्या वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. अकोट तालुक्यामध्ये जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी तथा प्रकल्प संचालक (आत्मा) अकोला डॉ. मुरली इंगळे, प्रकल्प उपसंचालक (आत्मा) डॉ.प्रेमसिंग मारग व तालुका कृषी अधिकारी अकोट एन.एस सुरडकर यांच्या मार्गदर्शनात नैसर्गिक शेतीशाळा - तूर पीक व्यवस्थापन या विषयावर शेतीशाळा राबविण्यात येत आहे. सदर आयोजित शेतीशाळा वर्गामध्ये प्रगतशील शेतकरी पुरुषोत्तम लांडे व संदीप ठाकूर (प्राचार्य,ना.सौ. वसुधाताई देशमुख कृषी तंत्र विद्यालय




मुंडगाव ता.अकोट) यांनी शेतकऱ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले. शेतीशाळेच्या दरम्यान शेतकऱ्यांनी उपस्थित केलेल्या विविध प्रश्नांचे त्यांनी निरसन सुद्धा केले. त्यानंतर मंडळ कृषी अधिकारी अकोट -1 पवन सुलताने यांनी कृषी विभाग मार्फत राबविण्यात येत असलेल्या विविध मोहीम व खरीप हंगामाच्या अनुषंगाने करावयाच्या उपाययोजना बाबत माहिती दिली.या शेतीशाळा वर्गाचे सूत्रसंचालन राहुल अडाणी (सहायक तंत्रज्ञान व्यवस्थापक) यांनी केले व शेतीशाळा वर्गामध्ये मिळालेली माहिती गावातील इतर शेतकरी बांधवांपर्यंत पोहोचवावी याबाबत नम्र आवाहन केले. सदर शेतीशाळा वर्गामधे सहायक कृषी अधिकारी करणसिंह आसोले व महिला शेतकरीसह शेतकरी बांधव उपस्थित होते..

## १ जूनपासून समुद्रात मासेमारीला बंदी; नियमांचे उल्लंघन केल्यास होणार कडक कारवाई

**दैनिक युवक आधार**

**कल्याण रमेश राऊत, ग्रामिण प्रतिनिधी** : ठाणे आणि पालघर जिल्ह्यांतील मच्छीमारांसाठी एक अत्यंत महत्त्वाची बातमी आहे. समुद्रातील मासळीच्या साठ्याचे जतन करण्यासाठी आणि पावसाळ्यातील वादळी हवामानापासून मच्छीमारांच्या जीविताचे रक्षण करण्यासाठी शासनाने यंदा १ जून ते ३१ जुलै २०२६ या कालावधीत पावसाळी मासेमारीवर अधिकृत बंदी जाहीर केली आहे. ठाणे-पालघर जिल्ह्याचे मत्स्यव्यवसाय सहाय्यक आयुक्त (तांत्रिक) दिनेश पाटील यांनी या संदर्भातील अधिकृत माहिती दिली आहे. या दोन महिन्यांच्या कालावधीत समुद्रातील माशांचा प्रजोत्पादन काळ असतो, त्यामुळे या बंदीमुळे मासळीच्या बीज निर्मिती प्रक्रियेला मोठा वाव मिळून समुद्रातील मासळीचा साठा वाढण्यास मदत होते.

मत्स्यव्यवसाय विभागाने दिलेल्या आदेशानुसार, ही पावसाळी मासेमारी बंदी सर्व प्रकारच्या यंत्रचलित आणि यांत्रिक नौकांना पूर्णपणे लागू राहील. मात्र, पारंपरिक पद्धतीने मासेमारी करणाऱ्या बिगर-यंत्रचलित नौकांना या बंदीतून सवलत देण्यात आली आहे. सध्या समुद्रात गेलेल्या सर्व यांत्रिक नौकांनी ३१ मे २०२६ पूर्वीच आपापल्या बंदरांमध्ये परतणे बंधनकारक करण्यात आले असून, १ जून किंवा त्यानंतर कोणत्याही परिस्थितीत बंदरांवर मासे उतरवण्यास परवानगी दिली जाणार नाही. तसेच, राज्याच्या सागरी किनाऱ्यापासून १२ सागरी मैलांपर्यंतच्या क्षेत्राबाहेर खोल समुद्रात जाणाऱ्या नौकांना केंद्र शासनाचे धोरण व मार्गदर्शक सूचना लागू राहतील.

या शासकीय नियमांचे काटेकोरपणे पालन करण्याचे आवाहन सर्व मच्छीमार सहकारी संस्थांना करण्यात आले आहे. जर बंदीच्या काळात कोणतीही यांत्रिक नौका बेकायदेशीरपणे मासेमारी करताना आढळली, तर महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियमांतर्गत ती नौका, त्यावरील उपसाधने आणि पकडलेली मासळी जप्त करून संबंधित मालकावर अत्यंत कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल. इतकेच नव्हे तर, बंदीच्या काळात समुद्रात जाऊन अपघात झाल्यास अशा नौकेला शासनाकडून कोणतीही आर्थिक नुकसान भरपाई मिळणार नाही, असेही शासनाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे सर्व नौकामालकांनी नियमांचे पालन करून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन मत्स्यव्यवसाय विभागाकडून करण्यात आले आहे.

# एआय पॉवर्डद्वारे विद्यार्थ्यांसाठी आधुनिक, कौशल्याधारित व रोजगाराभिमुख शिक्षणाची नवी दिशा

**दैनिक युवक आधार**

**पनवेल(प्रतिनिधी) :** बदलत्या तंत्रज्ञानाच्या युगात विद्यार्थ्यांना आर्टिफिशियल इंटेलिजन्स (AI), डिजिटल कौशल्ये आणि रोजगाराभिमुख शिक्षणाची जोड मिळावी या उद्देशाने पनवेल येथे प्रसिद्धी माध्यमांना एआय पॉवर्डद्वारे एम एस सीआयटी, क्लिक कोर्सेस आणि आयलाईक क्रेडिट कोर्सेस या महत्त्वपूर्ण शैक्षणिक उपक्रमांची सविस्तर माहिती देण्यात आली. आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने विद्यार्थ्यांना भविष्यातील स्पर्धात्मक जगासाठी सक्षम बनविण्याचा या उपक्रमांचा मुख्य उद्देश असल्याचे यावेळी सांगण्यात आले. शिक्षणामध्ये तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून विद्यार्थ्यांना भविष्यकालीन रोजगार, डिजिटल अर्थव्यवस्था आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स आधारित जगासाठी तयार करणे ही काळाची गरज असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. “एआय आधारित आधुनिक शिक्षण, डिजिटल साक्षरता, कौशल्य विकास आणि रोजगाराभिमुख प्रशिक्षणाच्या माध्यमातून प्रत्येक विद्यार्थ्याला सक्षम बनविणे” हा या उपक्रमांचा मुख्य उद्देश असल्याचे सांगितले. यावेळी नटराज कटकधोंड (महाव्यवस्थापक, एम. के. सी. एल., पुणे), जयंत भगत (मेंटॉर, एम. के. सी. एल., कोकण विभाग), मंगेश जाधव (विभागीय समन्वयक, एम. के. सी. एल., कोकण विभाग) आणि सिद्धेश गोसावी (जिल्हा समन्वयक, एम. के. सी. एल., रायगड) उपस्थित होते.

यावेळी MS-CIT या राज्यातील सर्वाधिक लोकप्रिय संगणक साक्षरता अभ्यासक्रमाच्या AI Powered नव्या स्वरूपाचे सादरीकरण करण्यात आले. पारंपरिक संगणक शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांना आधुनिक आर्टिफिशियल




इंटेलिजन्स आधारित शिक्षण अनुभव देण्यासाठी एआय एक्स्पीरियंस मॅप विकसित करण्यात आला असून विद्यार्थ्यांच्या शिकण्याची पद्धत, गती, आवड आणि प्रगती लक्षात घेऊन वैयक्तिक लर्निंग सपोर्ट दिला जाणार असल्याची माहिती देण्यात आली. तसेच क्रांती या एआय आधारित अकॅडमिक फॅसिलिअटरचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या शंका निरसनापासून परीक्षा तयारीपर्यंत, तसेच स्टडी प्लॅनिंग, प्रॅक्टिस गाईडन्स, कम्युनिकेशन स्किल्स, आणि करिअर गाईडन्स यांसाठी क्रांती प्रभावी डिजिटल सहाय्यक म्हणून कार्य करणार असल्याचे सांगण्यात आले. विद्यार्थ्यांना आधुनिक एआय टूल्सचा वापर करून स्मार्ट नोट्स तयार करणे, रिज्युम रायटिंग, प्रेझेन्टेशन तयार करणे, कन्टेन्ट क्रिएशन, प्रॉडक्टिव्हिटी वाढविणे आणि डिजिटल पद्धतीने अभ्यास करणे यांसारखी आधुनिक स्टडी स्किल शिकविण्यात येत असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. आर्थिकदृष्ट्या गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी सहज उपलब्ध व्हावी यासाठी मल्टी इंस्टालमेंट फी सुविधा उपलब्ध करण्यात आली असून विद्यार्थी घरबसल्या शिक्षण घेऊ शकतील यासाठी At-Home Learning Facility देखील उपलब्ध करून देण्यात आल्याचे स्पष्ट करण्यात आले. ग्रामीण भागातील तसेच नोकरी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ही सुविधा विशेष उपयुक्त ठरणार असल्याचे नमूद करण्यात आले. याशिवाय विविध क्षेत्रात यश मिळविलेल्या विद्यार्थ्यांचे अनुभव आणि यशोगाथा (Learner Testimonials) सादर करून या अभ्यासक्रमांचा विद्यार्थ्यांच्या करिअर विकासामध्ये होत असलेला सकारात्मक परिणाम अधोरेखित करण्यात आला.क्लिक कोर्सेस विषयी माहिती देताना उद्योग क्षेत्राच्या गरजेनुसार तयार करण्यात आलेले २६५ पेक्षा अधिक स्किल बेस्ड आणि रोजगाराभिमुख अभ्यासक्रम विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असल्याचे सांगण्यात आले. डिजिटल मार्केटिंग, ग्राफिक डिझाईन, वेब डेव्हलोपमेंट, पायथॉन प्रोग्रामिंग, डेटा ॲनालिटिक्स, टॅली जीएसटी, ऑटो कॅड, विडिओ एडिटिंग, फायनान्शिल अकॉउंटिंग, ऑफिस ऑटोमेशन यांसारख्या विविध क्षेत्रांतील अभ्यासक्रमांद्वारे विद्यार्थ्यांना आधुनिक कौशल्ये आत्मसात करण्याची संधी मिळत असल्याचे स्पष्ट करण्यात आले. विद्यार्थ्यांना केवळ प्रमाणपत्र नव्हे तर प्रत्यक्ष रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यावर विशेष भर देण्यात येत असल्याचे सांगण्यात आले. स्थानिक उद्योग, व्यावसायिक संस्था आणि विविध कंपन्यांच्या सहकार्याने विद्यार्थ्यांना Placement Opportunities उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न सुरू असल्याची माहिती देण्यात आली. KRANTI च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना Career Guidance, Interview Preparation, Skill Assessment आणि Learning Support उपलब्ध होणार असल्याचेही यावेळी सांगण्यात आले. तसेच iLike Credit Courses हे अभ्यासक्रम राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) अनुषंगाने विकसित करण्यात आले असून उच्च शिक्षण संस्थांमध्ये Skill-Based आणि Credit-Oriented शिक्षणाला चालना देण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचे सांगण्यात आले. विद्यार्थ्यांना Academic Credits, Industry Exposure, Practical Learning आणि रोजगाराभिमुख कौशल्ये एकाच वेळी मिळावीत यासाठी हे अभ्यासक्रम उपयुक्त ठरत असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

## रिसोडमध्ये ईद-उल-अजहाचा जल्लोष;
## भाईचारा, शांतता आणि सामाजिक ऐक्याचा अनोखा संदेश

**दैनिक युवक आधार**

**नागपूर रंजित ठाकुर तालुका प्रतिनिधी :** रिसोड शहरासह संपूर्ण तालुक्यात ईद-उल-अजहा अर्थात बकरी ईद मोठ्या उत्साहात, धार्मिक वातावरणात आणि सामाजिक ऐक्याच्या भावनेत साजरी करण्यात आली. सोमवारी सकाळपासूनच मुस्लिम बांधवांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. शहरातील विविध भागांतील मुस्लिम समाजातील नागरिक पारंपरिक वेशभूषेत एकत्र जमले होते. लहान चिमुकल्यांपासून ते ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांमध्ये आनंदाचे वातावरण होते.

सकाळी सुमारे ८:३० वाजता शहरातील विविध भागातून मुस्लिम बांधव एकत्र येत लोणी मार्गावरील ईदगाहकडे रवाना झाले. शाही इमाम अब्दुल दयार यांच्या नेतृत्वात निघालेल्या या धार्मिक मिरवणुकीत मोठ्या संख्येने नागरिक सहभागी झाले



होते. “अल्लाहू अकबर”च्या घोषणांनी परिसर भक्तिमय झाला होता.

लोणी मार्ग स्थित ईदगाह मैदानावर सकाळी ८:४५ वाजता शाही इमाम मो. दयार यांनी ईदची विशेष नमाज अदा करून घेतली. यावेळी हजारो मुस्लिम बांधवांनी एकत्रितपणे नमाज पठण करत देशात शांतता, सलोखा आणि समृद्धीसाठी प्रार्थना केली. देशात भाईचारा वाढावा, भरपूर पाऊस पडावा, शेतकरी आणि मजूर वर्ग सुखी राहावा तसेच व्यापार-उद्योगात भरभराट व्हावी, अशी सामूहिक दुआ करण्यात आली.

नमाज पूर्ण झाल्यानंतर मुस्लिम बांधवांनी एकमेकांना गळाभेट देत “ईद मुबारक”च्या शुभेच्छा दिल्या. अनेकांनी आपल्या नातेवाईकांच्या घरी जाऊन वडीलधाऱ्यांचे आशीर्वाद घेतले. शहरात सर्वत्र आनंद, प्रेम आणि आपुलकीचे वातावरण निर्माण झाले होते.

ईदच्या पार्श्वभूमीवर रिसोड पोलिस प्रशासनाने अत्यंत नियोजनबद्ध आणि सतर्क भूमिका बजावली. ठाणेदार रामेश्वर चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली पोलिसांचा चोख बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. ईदगाह परिसरासह शहरातील प्रमुख चौक, संवेदनशील भाग आणि गर्दीच्या ठिकाणी पोलिस कर्मचारी दक्षतेने कार्यरत होते. ठाणेदार रामेश्वर चव्हाण यांनी स्वतः संपूर्ण परिस्थितीवर लक्ष ठेवत शांतता आणि सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी विशेष खबरदारी घेतली.

रिसोड पोलिसांनी दाखविलेल्या तत्परतेमुळे आणि ठाणेदार रामेश्वर चव्हाण यांच्या प्रभावी नियोजनामुळे ईदचा उत्सव कोणताही अनुचित प्रकार न घडता शांततेत आणि आनंदात पार पडला. नागरिकांनी देखील पोलिस प्रशासनाच्या कार्याचे कौतुक करत ठाणेदार चव्हाण यांच्या सकारात्मक भूमिकेचे अभिनंदन केले.यंदाची ईद-उल-अजहा ही केवळ धार्मिक उत्सव न ठरता सामाजिक ऐक्य, बंधुभाव आणि शांततेचा संदेश देणारी ठरली. रिसोड शहराने पुन्हा एकदा धार्मिक सलोखा आणि एकात्मतेची सुंदर परंपरा कायम राखल्याचे चित्र पाहायला मिळाले.

## “माझा कारखाना, माझी जबाबदारी”
## पृथ्वीराज बापू जाचक यांच्या नेतृत्वाला वर्षपूर्ती

**दैनिक युवक आधार**

**सणसर :- विकास क्षत्रिय :** श्री छत्रपती सहकारी साखर कारखान्याचे सर्वेसर्वा, महाराष्ट्र राज्य साखर संघाचे माजी अध्यक्ष तसेच कुशल प्रशासक मा.पृथ्वीराज बापू जाचक साहेब यांनी चेअरमन पदाची सूत्रे स्वीकारून आज यशस्वी एक वर्ष पूर्ण केले.“माझा कारखाना,माझी जबाबदारी”हा प्रेरणादायी स्लोगन समोर ठेवत त्यांनी कारखान्याच्या विकासासाठी सातत्याने कार्य केले असून कामगार,अधिकारी आणि संचालक मंडळ यांच्यात उत्कृष्ट समन्वय साधत कारखान्याची वाटचाल प्रगतीपथावर नेली आहे.या एका वर्षात कारखान्याच्या ओव्हरहॉलिंगची महत्त्वाची कामे,अंतर्गत रस्त्यांची दुरुस्ती,तसेच कारखान्याची हद्द निश्चित करून कारखान्याच्या मालमत्तेचे संरक्षण करणारा महत्त्वपूर्ण प्रोजेक्ट हाती



घेण्यात आला. या निर्णयांमुळे कारखान्याच्या विकासाला नवे बळ मिळाले असून सभासदांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

कामगारांच्या हिताला नेहमीच प्राधान्य देणाऱ्या पृथ्वीराज बापूंनी राज्यातील साखर कारखान्यांमध्ये सर्वप्रथम पगारवाढ देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला. या निर्णयामुळे कामगार वर्गामध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून बापूंच्या नेतृत्वाबद्दल कृतज्ञतेची भावना व्यक्त होत आहे. चेअरमन पदाच्या वर्षपूर्तीनिमित्त चेअरमन, व्हा.चेअरमन तसेच सर्व संचालक मंडळाने काटेवाडी येथील स्व अजितदादा पवार यांच्या निवासस्थानी भेट देऊन स्व.अजितदादा पवार यांच्या विद्या प्रतिष्ठाण बारामती येथील समाधीस्थळाचे दर्शन घेत अभिवादन केले.त्यानंतर भवानीनगर येथील भवानीमाता मंदिरात आरती करून दर्शन घेऊन कारखान्याच्या प्रगतीसाठी आशीर्वाद घेतले.यावेळी उपस्थित चेअरमन पृथ्वीराज जाचक,व्हाईस चेअरमन कैलास गावडे,संचालक रामचंद्र निंबाळकर,शिवाजीराव निंबाळकर, पृथ्वीराज घोलप,ॲड. शरद जामदार,अनिल काटे, बाळासाहेब कोळेकर, अशोकराव पाटील, विठ्ठलराव शिंगाडे,प्रशांत दराडे,मंथन कांबळे,सतीश देवकाते, संतोष मासाळ, तानाजी शिंदे अजित नरूटे, सुचिता सचिन सपकळ, माधुरी सागर राजपुरे, कार्यकारी संचालक अशोक जाधव जनरल मॅनेजर हनुमंत करवर,कामगार नेते युवराज रणवरे सर्व अधिकारी व कामगार उपस्थित होते.

कारखान्याचे सर्व सभासद,कामगार व हितचिंतकांकडून पृथ्वीराज बापू जाचक साहेब यांच्या कार्याचे कौतुक करण्यात येत असून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली श्री छत्रपती सहकारी साखर कारखाना भविष्यात आणखी उंच भरारी घेईल असा विश्वास सभासदांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

## NEET परीक्षा घोळामुळे देशभर संताप;
## “२३ लाख विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ

**दैनिक युवक आधार**

**रोशन खोब्रागडे लाखनी -** देशातील सर्वात मोठी वैद्यकीय प्रवेश परीक्षा असलेल्या NEET परीक्षेतील कथित गैरव्यवहार, पेपरफुटी आणि गुणांकनातील गोंधळामुळे संपूर्ण देशभर संतापाची लाट उसळली आहे. लाखो विद्यार्थ्यांनी दिवस-रात्र मेहनत करून दिलेल्या परीक्षेच्या पारदर्शकतेवरच आता प्रश्न उपस्थित होत आहेत.विद्यार्थी, पालक आणि विविध सामाजिक संघटनांनी केंद्र सरकारवर जोरदार टीका करत निष्पक्ष चौकशीची मागणी केली आहे. “देशातील २३ लाख विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ करणाऱ्यांना माफी नाही,” अशा तीव्र भावना सर्वसामान्यांमधून व्यक्त होत आहेत. विरोधकांनी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करत, “परीक्षा पद्धतीत सुधारणा होण्यापूर्वी नैतिक जबाबदारी स्वीकारली पाहिजे,” असे म्हटले आहे. विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे की, सतत होणारे पेपरफुटीचे प्रकार, एजंटमार्फत होणारे गैरव्यवहार आणि व्यवस्थेतील त्रुटींमुळे मेहनती विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे. अनेक ठिकाणी विद्यार्थ्यांनी आंदोलन करत “NEET पुन्हा घ्या”, “भविष्याशी खेळ बंद करा” अशा घोषणा दिल्या. शिक्षणतज्ज्ञांच्या मते, देशातील स्पर्धा परीक्षांवरील विश्वास टिकवायचा असेल तर परीक्षा प्रणाली अधिक पारदर्शक, तंत्रज्ञानाधारित आणि भ्रष्टाचारमुक्त करणे अत्यावश्यक आहे. अन्यथा विद्यार्थ्यांचा शिक्षण व्यवस्थेवरील विश्वास कायमचा डळमळीत होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. दरम्यान, सर्वोच्च न्यायालय आणि केंद्र सरकारच्या भूमिकेकडे आता संपूर्ण देशाचे लक्ष लागले असून, लाखो विद्यार्थ्यांना न्याय मिळणार का, हा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे.

## शासकीय गायराण–पड जमिनीवरील शेती अतिक्रमणेही नियमीत करा; भूमिहीनांना कायमस्वरूपी न्याय द्या – ज्ञानेश्वरभाऊ सुर्यवंशी

**दैनिक युवक आधार**

**देवणी तालुका प्रतिनिधी पांडुरंग कदमम :** शासकीय जमिनीवरील घरासाठीच्या जागेची नोंदणी नियमानुकूल करण्याचा निर्णय स्वागतार्ह असून, त्याच धर्तीवर कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी गायराण व पड जमिनीवर शेती करणाऱ्या भूमिहीन, दलित, आदिवासी, भटके-विमुक्त समाजाच्या अतिक्रमणांनाही नियमीत करून कायमस्वरूपी न्याय द्यावा, अशी मागणी श्रमिक हक्क अभियान एन.सी. डी.एच.आर. (भारत) संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे.महाराष्ट्र जमीन महसूल संहिता 1966 मधील तरतुदीनुसार शासकीय जमिनीवरील दि. 01 जानेवारी 2011 पर्यंतची निवासी अतिक्रमणे दि. 25 मार्च 2026 रोजी छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या बैठकीत शासन निर्णयाची अंमलबजावणी करून 15 मे पर्यंत पात्र लाभार्थ्यांना जमीन हस्तांतरण करण्यासाठी विभागीय आयुक्त श्रीकांत यांनी निर्देश दिले या निर्णयाचे तसेच दि. 04 एप्रिल 2002 पासून ते दि. 24 मार्च 2026 पर्यंतच्या शासन निर्णयाचा आधार घेऊन, सन 1978-89 पूर्वीपासून ते आजतागायत सरकारी गायराण व पड जमिनीवर उदरनिर्वाहासाठी शेती करणाऱ्या भूमिहीन, दलित, आदिवासी व भटके-विमुक्त समाजाच्या कुटुंबांचे ताबे पाहून त्यांची शेती अतिक्रमणे विनाअट नियमीत करण्यात यावीत. “सर्वांसाठी घरे” या संकल्पनेप्रमाणे “सर्वांसाठी गायराण जमीन – जगण्यासाठी हीच जमीन” या तत्वानुसार शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली.यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे. राज्यपाल तसेच विविध आयोग, विभागीय आयुक्त आणि सर्व जिल्हाधिकाऱ्यांना तहसीलदार सोमनाथ वाडकर देवणी यांच्या माध्यमातून दि.18/05/2026 रोजी निवेदन सादर करण्यात आले. या निवेदनाद्वारे ज्ञानेश्वरभाऊ सुर्यवंशी डायरेक्टर.लातूर जिल्हा अध्यक्ष दशरथ कांबळे श्रमिक हक्क अभियान एन.सी.डी.एच.आर. (भारत) यांनी राज्य सरकारकडे न्याय्य व कायमस्वरूपी निर्णय घेण्याची मागणी केली आहे.

## महावितरणतर्फे स्वातंत्र्यवीर सावरकर यांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन

**दैनिक युवक आधार**

**नागपूर सतीश कडू संपादक विभाग :** स्वातंत्र्य लढ्यातील अग्रगण्य क्रांतिकारक, द्रष्टे समाजसुधारक, प्रखर राष्ट्रभक्त आणि अंदमानच्या काळ्या पाण्याची कठोर शिक्षा भोगणारे एकमेवाद्वितीय स्वातंत्र्यसैनिक स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त आज महावितरणतर्फे त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले.



काटोल मार्गावरील महावितरणच्या ‘विद्युत भवन’ येथे जयंती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी नागपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता दिलीप दोडके यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करून त्यांच्या अजोड देशसेवेला व क्रांतीकार्याला अभिवादन केले.

या प्रसंगी उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी सचिन लहाने, प्रणाली विश्लेषक प्रवीण काटोले आणि उपमुख्य जनसंपर्क अधिकारी योगेश विटनकर प्रामुख्याने उपस्थित होते. स्वातंत्र्यवीरांच्या महान त्यागाचे स्मरण करत महावितरणच्या अनेक वरिष्ठ अधिकाऱ्यांनी, अभियंत्यांनी व कर्मचाऱ्यांनीही त्यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून आदरांजली वाहिली.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# दिल्लीतील महाराष्ट्र सदनातील प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करा – मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांची अधिकाऱ्यांना तंबी

## दिल्ली येथील अधिकारी व कर्मचारी निवास तसेच इतर प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश

**दैनिक युवक आधार**
**नवी दिल्ली / प्रतिनिधी** : सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी दिल्ली दौऱ्यादरम्यान नवीन व जुने महाराष्ट्र सदन येथील विविध प्रलंबित विकासकामांचा सविस्तर आढावा घेत संबंधित विभागातील अधिकारी व अभियंत्यांची बैठक घेतली. महाराष्ट्र सदनातील कामांमध्ये होत असलेली अनावश्यक दिरंगाई खपवून घेतली जाणार नसल्याचे स्पष्ट करत कामे दर्जेदार, नियोजनबद्ध आणि वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. तसेच कामांबाबत हलगर्जीपणा व निष्काळजीपणा करणाऱ्या अधिकाऱ्यांना त्यांनी स्पष्ट शब्दांत तंबी दिली.

महाराष्ट्रातून दिल्ली येथे विविध शासकीय कामांसाठी, उपचारांसाठी तसेच इतर कारणांनी मोठ्या प्रमाणावर नागरिक येत असतात. अशा नागरिकांना महाराष्ट्र सदनात अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी शासन प्राधान्याने काम करत असल्याचे मंत्री भोसले यांनी यावेळी सांगितले. महाराष्ट्र सदन हे राज्याचे प्रतिनिधित्व करणारे महत्त्वाचे केंद्र असल्याने येथील सुविधा, स्वच्छता, देखभाल आणि आधुनिक सोयीसुविधा उच्च दर्जाच्या असणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. त्याच बरोबर अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी मंजूर केलेले निवासाचे काम देखील जलद गतीने पूर्ण कणायसाठी सूचना दिल्या.

बैठकीदरम्यान नवीन महाराष्ट्र सदन व जुने महाराष्ट्र सदन येथे सुरू असलेल्या दुरुस्ती, सुशोभीकरण, कर्मचारी निवास व्यवस्था सुधारणा, विद्युत व्यवस्था, पायाभूत सुविधा उन्नतीकरण, अंतर्गत देखभाल तसेच विविध प्रलंबित कामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. अनेक कामे मंजूर होऊनही अद्याप पूर्णत्वास न गेल्याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली. संबंधित अधिकाऱ्यांनी नियमितपणे प्रत्यक्ष पाहणी करून कामांमध्ये गती आणावी तसेच कामांच्या गुणवत्तेत कोणतीही तडजोड होऊ नये, अशा स्पष्ट सूचना मंत्री भोसले यांनी दिल्या.

कामांच्या प्रगतीबाबत समाधानकारक स्थिती दिसून न आल्याने काही संबंधित अधिकाऱ्यांना मंत्री भोसले यांनी बैठकीतच कडक शब्दांत तंबी दिली. नागरिकांच्या सुविधांशी संबंधित कामांमध्ये विलंब होणे गंभीर बाब असून, यापुढे कामकाजात दिरंगाई आढळल्यास संबंधितांवर जबाबदारी निश्चित करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला. यावेळी महाराष्ट्र सदनातील विविध विकासकामांच्या प्रगतीचा आढावा घेण्यात आला. यापूर्वी मंजूर करण्यात आलेल्या विविध कामांची सद्यस्थिती, कामांची गती आणि गुणवत्ता याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. या कामांमध्ये कोणतीही दिरंगाई होऊ नये तसेच नागरिकांना दर्जेदार सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी आवश्यक त्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या.

शासन निर्णयानुसार नवीन महाराष्ट्र सदनाच्या मागील बाजूचे नुतनीकरण, नवीन व जुन्या महाराष्ट्र सदनातील विद्युत उपकरणांचे अद्यावतीकरण तसेच आधुनिक आयपी आधारित सीसीटीव्ही यंत्रणा उभारणीस प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. त्यामध्ये नुतनीकरण, विद्युतीकरण, फर्निचर, एचव्हीएसी दुरुस्ती, एलईडी प्रकाशयोजना सुधारणा, विद्युत वायरिंग बदल, तसेच नवीन सीसीटीव्ही यंत्रणा स्थापनेचा समावेश आहे.

कामे हाती घेताना अर्थसंकल्पीय तरतूद, तांत्रिक मान्यता, पर्यावरण विषयक नियम, 'ना हरकत' प्रमाणपत्रे, ई-निविदा प्रक्रिया तसेच GeM पोर्टलच्या कार्यपद्धतीचे पालन करण्याच्या सूचनाही शासनाने दिल्या आहेत. कामांमध्ये गुणवत्तेला प्राधान्य देत वेळेत पूर्ण करण्यावर भर देण्यात आला आहे.

कामांची गुणवत्ता, वेळेचे नियोजन आणि प्रशासनातील समन्वय याबाबत अधिक दक्षता घेण्याचे निर्देश देत मंत्री भोसले यांनी संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने कार्यवाही करण्यास सांगितले. कामांच्या प्रगतीचा नियमित आढावा घेण्यात येईल तसेच प्रलंबित कामांबाबत हलगर्जीपणा करणाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करण्यात येईल, असेही त्यांनी नमूद केले.यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागातील वरिष्ठ अधिकारी, अभियंते तसेच महाराष्ट्र सदन प्रशासनातील संबंधित अधिकारी उपस्थित होते.

---

# तुमचा छोटासा सहभाग एखाद्या कुटुंबासाठी जगण्याची नवी आशा ठरू शकतो."

## (नमस्ते नाशिक फाउंडेशनचे सहकार्याचे महत्वाचे पाऊल)

**दैनिक युवक आधार**
**निफाड क्रीडा प्रतिनिधी विलास गायकवाड** : : जीवनात मागे बघाल तर अनुभव मिळेल, पुढे बघाल तर आशा मिळेल, इकडे-तिकडे बघाल तर सत्य दिसेल, आणि स्वतःच्या अंतर आत्म्यात डोकावाल तर आत्मविश्वास मिळेल. याच आत्मविश्वासातून "नमस्ते नाशिक फाउंडेशन" यांच्या वतीने गरजू आणि घरात अपंग व्यक्ती असलेल्या कुटुंबांना किराणा वस्तूंचे वाटप करण्यात आले.भारतामध्ये अनेक कुटुंबे आर्थिक अडचणींमध्ये जीवन जगत आहेत. अनेक महिलांच्या पतींना नियमित उत्पन्न नसल्यामुळे त्यांच्या कुटुंबासमोर उपासमारीचे संकट निर्माण होते. अशा परिस्थितीत पौष्टिक, स्वच्छ आणि ताजे अन्न मिळणे ही त्यांची अत्यंत मूलभूत गरज ठरते.



या सामाजिक जाणिवेतून नमस्ते नाशिक फाउंडेशनच्या अध्यक्षा सौ. स्नेहल देव यांच्या नेतृत्वाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. समाजातील गरजू बांधवांना मदतीचा हात देत त्यांच्या जीवनात आनंद, आधार आणि आशेचा किरण निर्माण करण्याचा हा छोटासा प्रयत्न आहे.या उपक्रमासाठी अजय देव, सौ. कमल पाटील आणि नहार यांचे मोलाचे सहकार्य लाभले, नमस्ते नाशिक फाउंडेशन यांच्या वतीने आपणास आवाहन करण्यात येते की, आपणही या समाजोपयोगी उपक्रमात सहभागी होऊन गरजूंच्या जीवनात आशेचा किरण निर्माण करावा. चला, एकत्र येऊन माणुसकीची नवी ओळख निर्माण करूया आणि समाजासाठी प्रेरणादायी कार्याचा भाग बनूया.

---

# गोरगरिबांच्या न्यायासाठी धडपडणाऱ्या रिसोडच्या तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव!

## अर्जुन पाटील खरात यांच्या पुढाकारातून तहसील कार्यालयात वाढदिवस उत्साहात साजरा!

**दैनिक युवक आधार**
**रिसोड रंजित ठाकुर तालुका प्रतिनिधी** : रिसोडच्या कर्तव्यदक्ष तहसीलदार माननीय प्रतीक्षा ताई तेजनकर यांच्या वाढदिवसानिमित्त तहसील कार्यालयात उत्साहपूर्ण वातावरणात अभिष्टचिंतन सोहळा पार पडला. पुण्यनगरीचे तालुका प्रतिनिधी, रिसोड सिटी न्यूजचे मुख्य संपादक तथा संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष अर्जुन पाटील खरात यांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाला पत्रकार, संभाजी ब्रिगेडचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



रिसोडमध्ये तहसीलदार म्हणून पदभार स्वीकारल्यानंतर प्रतीक्षा तेजनकर यांनी प्रशासनात पारदर्शकता, तत्परता आणि लोकाभिमुख कार्यपद्धती रुजवली आहे. सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, कष्टकरी आणि गोरगरिबांच्या समस्या समजून घेत त्यांची कामे तातडीने मार्गी लावण्यावर त्यांनी भर दिला आहे. त्यामुळे आज रिसोडमध्ये "जनतेच्या न्यायासाठी धडपडणाऱ्या अधिकारी" म्हणून प्रतीक्षा तेजनकर यांची वेगळी ओळख निर्माण झाली आहे.

यावेळी अर्जुन पाटील खरात यांनी प्रतीक्षा तेजनकर यांच्या कार्याचे कौतुक करत सांगितले की, "प्रशासनात संवेदनशीलता आणि प्रामाणिकपणा असेल तर सामान्य माणसाला न्याय मिळण्यासाठी दारोदार फिरावे लागत नाही. प्रतीक्षा तेजनकर यांनी रिसोडमध्ये लोकाभिमुख प्रशासनाचा आदर्श निर्माण केला आहे." अर्जुन पाटील खरात यांनी त्यांच्या कार्यशैलीमुळे नागरिकांचा प्रशासनावरील विश्वास अधिक दृढ झाल्याचेही नमूद केले.

प्रतीक्षा तेजनकर यांनी आपल्या कामातून प्रशासन केवळ कागदोपत्री नसून जनतेच्या प्रश्नांना न्याय देणारे माध्यम असते हे दाखवून दिले आहे. नागरिकांच्या अडचणी तात्काळ समजून घेऊन त्या सोडविण्याची त्यांची कार्यतत्परता आज अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. तहसील कार्यालयात कामासाठी येणाऱ्या नागरिकांना जलद सेवा मिळू लागल्याने समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

कार्यक्रमादरम्यान उपस्थित पत्रकार, संभाजी ब्रिगेडचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी प्रतीक्षा तेजनकर यांना शुभेच्छा देत त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी सदिच्छा व्यक्त केल्या. अर्जुन पाटील खरात यांच्यासह अनेक मान्यवरांनी प्रशासनातील सकारात्मक बदलासाठी त्यांच्या कार्याचे विशेष कौतुक केले.

"ज्या अधिकाऱ्यांच्या निर्णयात जनतेविषयी संवेदनशीलता असते, त्या प्रशासनावर लोकांचा विश्वास आपोआप वाढतो," हे प्रतीक्षा तेजनकर यांच्या कार्यातून पुन्हा एकदा अधोरेखित झाल्याची भावना यावेळी उपस्थितांनी व्यक्त केली.

---

# मालेगाव 33 केव्ही जवळ अर्धापूर रोड बनला धोकादायक; प्रशासनाचे दुर्लक्ष"

**दैनिक युवक आधार**
**अर्धापूर गंगाधर कदम ग्रामीण तालुका प्रतिनिधी** : मालेगाव ते अर्धापूर जाणारा मुख्य रस्ता सध्या वाहनधारकांसाठी अक्षरशः धोकादायक बनला असून मालेगाव येथील 33 केव्ही परिसरात रस्त्याचा मोठा भाग दबला गेल्यामुळे दररोज अपघाताचा धोका वाढत चालला आहे. मात्र, इतकी गंभीर परिस्थिती निर्माण होऊनही संबंधित प्रशासन मात्र अजूनही झोपेचे सोंग घेत असल्याचा संतप्त आरोप नागरिकांकडून केला जात आहेआज याच धोकादायक ठिकाणी एका शेतकऱ्याचा हळद वाहतूक करणारा ट्रॅक्टर अचानक पलटी होऊन मोठ्या प्रमाणात हळदीचे नुकसान झाले. कष्टाने पिकवलेले पीक काही क्षणात रस्त्यावर विखुरले गेले. सुदैवाने या



घटनेत जीवितहानी झाली नाही, पण जर एखादा मोठा ट्रक, स्कूल बस किंवा प्रवासी वाहन या ठिकाणी अपघातग्रस्त झाले तर त्याला जबाबदार कोण? असा सवाल आता नागरिक उपस्थित करत आहेत.विशेष म्हणजे काही दिवसांपूर्वीही याच ठिकाणी मोटारसायकलस्वाराचा अपघात झाला होता. वारंवार अपघात घडूनही प्रशासनाने ना इशारा फलक लावले, ना वाहतूक सुरक्षेची कोणतीही उपाययोजना केली, ना तातडीची दुरुस्ती सुरू केली. त्यामुळे प्रशासन एखाद्या मोठ्या दुर्घटनेची वाट पाहत आहे का? असा तीव्र संताप नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे.हा रस्ता अर्धापूर, मालेगाव व परिसरातील शेतकरी, विद्यार्थी, कामगार आणि सर्वसामान्य नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाचा मार्ग आहे. दररोज हजारो नागरिक या रस्त्यावरून जीव धोक्यात घालून प्रवास करत आहेत. रात्रीच्या वेळी तर हा भाग अधिकच धोकादायक बनत असून मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.स्थानिक नागरिकांनी संबंधित बांधकाम विभाग व प्रशासनाने तात्काळ या रस्त्याची पाहणी करून दुरुस्ती करावी, धोकादायक ठिकाणी सुरक्षात्मक बॅरिकेड्स व इशारा फलक लावावेत, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून केली आहे.

---

# अत्यावश्यक वस्तूवरील मनमानी 'एमआरपी' विरोधात अ .भा .ग्राहक पंचायत मैदानात ; तहसीलदारांना निवेदन देऊन कार्यवाहीची मागणी !

**दैनिक युवक आधार**
**अंजनगाव सुर्जी संतोषराव घोडेराव** : अखिल भारतीय ग्राहक पंचायत, विदर्भ प्रांत यांच्यावतीने केंद्र शासनाकडे औषधे, कृषी आदाने व दैनंदिन वापराच्या वस्तूवरील मनमानी एमआरपी आकारत असल्याने या प्रणालीविरोधात अ.भा. ग्राहक पंचायत आक्रमक झाली असून याबत कारवाईसाठी त्यांनी तहसीलदारांना निवेदन सादर केले आहे.सदर निवेदनामध्ये सध्याच्या एमआरपी प्रणालीमध्ये कोणतीही वैज्ञानिक, पारदर्शक किंवा कायदेशीर मर्यादा नसल्याने कंपन्यांकडून



उत्पादनाच्या वास्तविक किमतीपेक्षा अनेक पटीने जास्त दर आकारले जात असल्याचा गंभीर मुद्दा मांडण्यात आला आहे. विशेषत: औषधे, OTC उत्पादने, बियाणे, सूक्ष्म अन्नद्रव्ये, कीटकनाशके व इतर कृषी आदानांमध्ये ग्राहक व शेतकऱ्यांचे मोठ्याप्रमाणात आर्थिक शोषण होत असल्याचे नमूद करण्यात आले आहे.निवेदनात जपान, युरोपियन युनियन व अमेरिकेतील नियंत्रित मूल्य प्रणालींचा संदर्भ देत भारतात 'Profit-Capped Suggested Retail Price (SRP)' प्रणाली लागू करण्याची मागणी करण्यात आली आहे. या प्रणाली अंतर्गत उत्पादन खर्च + वाहतूक खर्च + मर्यादित नफा (५% ते १०%) या सूत्रानुसार किंमत निश्चित करण्याची सूचना करण्यात आली आहे.निवेदन देताना अखिल भारतीय ग्राहक पंचायत, विदर्भ प्रांतचे नारायण मेहरे अध्यक्ष, नितीन काकडे पश्चिम क्षेत्र संघटन मंत्री, चारुदत्त चौधरी सचिव, अभय खेडेकर संघटन सचिव, आनंद संगई संयुक्त सचिव, विलास ठोसर सहसचिव आदी उपस्थित होते.

---

# डोंगराळ भागात उन्हाळी हंगामातील रानभाज्यांची पर्वणी

आदिवासी भाग हा पुर्वीपासून डोंगरमाथ्यांनी सजलेल्या अशा निसर्गाच्या सानिध्यात वास्तव्य करून राहणाऱ्या आदिवासी बाधवांना वनस्पती सृष्टी बरोबरच जंगली रानभाजी हे निसर्गाने वरदानच दिले आहे.नेहमीच ढगाळ वातावरण त्यामुळे या भागात रानभाज्यांची पर्वणी तयार होते . उन्हाळ्यात जंगलात वेगवेगळया रानभाज्या उगवतात . डोंगराळ भागात झाड, झुडपं धुंडाळून तर कुठे पडिक माळरानावर जाऊन आदिवासी बांधव रानभाज्या मिळवत असतात.रानभाज्या ह्या बिनखताच्या असल्याने बाजारातही जास्त मागणी असते. शरीरासाठी पौष्टिक आहार चवीला रूचकर आणि पचायला जड जात नाही त्यामुळे शहर वासियांना तर ह्या दिवसांत रानभाज्यांची भुरळच लागलेली असते. बाजारातील भाजी पाल्यांचे भाव वाढले असल्याने आदिवासी बांधव जंगलाची वाटच धरतात.

**१. दिघवढ (दिहगड)**


दिघवढ ही वेलवर्गीय रानभाजी मे महिन्यात झाडाझुडुपांमध्ये उगवते दिघवढीला मऊ काटे असतात कोवळा शेंडा तोडून भाजी करतात.

**२. शेवळा**

कंदवर्गीय रानभाजी उन्हाळयात झुडपांमध्ये उगवते काढून निसून घेतात आणि ताज्या कोवळया पाल्याची भाजी करतात उडदाच्या डाळीत शीजवतात जास्त चरकट लागू नये म्हणून बोंडार झाडाचा कोवळा पाला टाकतात कोकण परिसरात तर काकडाची फळ कुटून टाकतात त्यामुळे पातळ कालवण अतीशय रूचकर लागते फुललेली शेवळ वाळवून कणीक बनवतात .

**३.लुंढा**

ही वेलवर्गीय रानभाजी उन्हाळ्यात मे महिन्यात झाडाझुडुपांमध्ये उगवते दिघवढी सारखीच पण आकाराने जाड असते काटे



नसतात कोवळा शेंडा तोडून भाजी करतात.

**४.रान वाघाट**

रान वाघाट ही काटेरी वेलवर्गीय रानभाजी उन्हाळ्यात वाघाट वेलीला लिंबाच्या आकाराची फळं येतात कच्च्या फळांची साल काढून घेत बी फेकून देतात भाजी चवीला रूचकर लागते. ही वेल झाडाच्या पोकळीत किंवा दाट झुडपांमध्ये पांगलेली असते वेलीला वाघनख्या प्रमाणे काटे असतात म्हणून वाघाट म्हणतात वाघाट भाजीने आम्लपित्त दुर होण्यास मदत होते.

**५. मोखा**

मोखा हा वृक्ष तुरळक प्रमाणात डोंगराळ भागात आढळतो. आदिवासी भागात मे महिन्यात ग्रीष्म ऋतूत मोख्खाला नवी पालवी फुटते त्याची भाजी बनवली जाते अतीशय रूचकर लागते गर्भवती महिलांनी सेवन केल्यास कोनताही अशक्तपणा जाणवत नाही .

**६.मोह टोंळबा**

मोहाचे झाड आदिवासींचे कल्पवृक्ष म्हणून ओळखले जाते. त्याचे वेगवेगळे फायदे आहेत. .वाळलेल्या मोह फुलांची दारू गाळणे एप्रिल,मे, जून महिन्यात कच्च्या फळांची राळ धुऊन घेत साल काढून भाजी करतात परिपक्व झालेल्या टोळंबी पासून तेल गाळतात बाजारातील गोड तेलाच्या किंमती वाढल्या असल्याने आदिवासी बांधव मे, जून महिन्यात मोहाच्या झाडाखाली टोळंबी वेचतात . मोह फळांच्या पीकलेल्या फळातील सालीचा गाभा गोड लागतो. त्यामुळे रात्री वटवाघळे,हारोड, मोहट ( रानमांजर)हे पशू ,पक्षी झाडावर भ्रमंती करतात ती फळं तोडून घेत आंबा झाडावर नेऊन खातात आंब्याच्या झाडाखाली सकाळी मोह टोळंबी आढळते ती वेचून फोडून घेत आतील गाभा वाळवून तेल गाळतात. पावसाळ्यात शेतकरी बांधवांचे पाय नेहमीच ओले होत असल्याने बोटातील भागात जखम तयार होते. गांडोळ्या (चिखल्या) येतात मोहाचे तेल लावल्याने जखम भरून निघते व त्वचा कोरडी पडते.

**७. झारझुरा**

ही भाजी उन्हाळ्यात नदी, ओहळाच्या ठिकाणी पाण्याच्या गाळात वाढते पानांची भाजी बनवली जाते.

**८ कुहरूळा( कांचन)**

उन्हाळ्यात कुहरूळा झाडाची पालवी पुर्ण गळून पडते झाडाला नवी पालवी फुटते त्याची भाजी बनवली जाते.

**९. भोकरीची भाजी**

उन्हाळ्यात इतर झाडं पानांनी पुर्ण खकरून जातात अशावेळी भोकरीचं झाड मात्र पुर्ण फुलांनी बहरून जाते न फुललेल्या कच्च्या निळया कळया पासून भाजी व चटणी,मुटके बनवले जाते ती अतिशय रुचकर लागते भोकरीच्या भाजीने पोटातील आजार बरे होतात.आदिवासी डोंगराळ भागातील रानभाज्या आहारातील वापरा बरोबरच आयुर्वेदिक महत्त्वही तितकेच आहे.

**सुभाष कामडी**
**( आदिवासी साहित्य अभ्यासक )**

# मान्सूनच्या धोक्याला तोंड देण्यासाठी प्रशासन सज्ज ठेवा - जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर

## एकबुर्जी प्रकल्पावर रंगले थरारक आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण

**दैनिक युवक आधार**
**वाशीम करण धोंगडे जिल्हा प्रतिनिधी** : आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर संभाव्य पूरस्थिती, अतिवृष्टी, वीज पडणे आणि विविध नैसर्गिक संकटांचा मुकाबला करण्यासाठी वाशिम जिल्हा प्रशासनाने आता कंबर कसली असून, कोणतीही आपत्ती उद्भवल्यास जीवित व वित्तहानी टाळण्यासाठी सर्व यंत्रणांनी तातडीने 'ॲक्शन मोड'वर येण्याची गरज असल्याचे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी दिले. आपत्तीच्या काळात महसूल, पोलीस, ग्रामपातळीवरील यंत्रणा, आरोग्य विभाग आणि बचाव पथक यांच्यातील समन्वयच नागरिकांचे जीव वाचवणारा सर्वात महत्त्वाचा दुवा ठरणार असल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले.

जिल्हाधिकारी कार्यालय व जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, वाशीम यांच्या संयुक्त विद्यमाने वाशीम तालुक्यातील एकबुर्जी प्रकल्पावर आयोजित करण्यात आलेल्या 'मान्सूनपूर्व आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण' कार्यक्रमात ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. या एक दिवसीय प्रशिक्षण शिबिरात प्रशासनातील विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी, पोलीस दल, ग्राम महसूल अधिकारी, कोतवाल, आपदा मित्र, शोध व बचाव पथके तसेच स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

यावेळी उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर, उपविभागीय पोलिस अधिकारी नवदीप अग्रवाल, तहसीलदार निलेश पळसकर, ग्रामीण ठाणेदार श्रीदेवी पाटील, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शाहू भगत आणि नागपूर SDRF चे पोलीस उपनिरीक्षक बोंदर यांची प्रमुख उपस्थिती होती.



जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी आपल्या भाषणात स्पष्ट शब्दांत सांगितले की, हवामान बदलामुळे नैसर्गिक संकटांची तीव्रता वाढत चालली आहे. अतिवृष्टी, पूरस्थिती, वीज पडणे आणि अचानक निर्माण होणाऱ्या आपत्कालीन परिस्थितींना तोंड देण्यासाठी प्रशासनाने केवळ कागदी नियोजन न करता प्रत्यक्ष सज्जता ठेवणे अत्यंत गरजेचे आहे. कोणत्याही परिस्थितीत नागरिकांचे प्राण वाचवणे ही प्रशासनाची सर्वोच्च जबाबदारी असून, आपत्तीच्या काळात सर्व विभागांनी सतत संपर्कात राहून जलद आणि प्रभावी मदतकार्य करावे, असे त्यांनी बजावले.

ते पुढे म्हणाले की, आपत्ती व्यवस्थापनात वेळेचे महत्त्व अत्यंत मोठे असते. संकटाच्या वेळी विलंब झाला तर परिस्थिती गंभीर बनते. त्यामुळे गावपातळीपासून जिल्हास्तरापर्यंत प्रत्येक यंत्रणेकडे स्पष्ट कृती आराखडा असणे आवश्यक आहे. प्रशासन, पोलीस, आरोग्य विभाग, ग्रामपंचायत, स्वयंसेवी संस्था आणि स्थानिक नागरिक यांनी एकत्रितपणे काम केल्यास कोणत्याही संकटावर यशस्वीपणे मात करता येते, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना तहसीलदार निलेश पळसकर यांनी प्रशिक्षणाचा उद्देश स्पष्ट केला. गावपातळीवर आपत्ती निवारणाची संस्कृती निर्माण करणे ही काळाची गरज असल्याचे सांगत त्यांनी प्रत्येक गावाने संभाव्य धोके ओळखून स्वतःचा स्वतंत्र आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करावा, असे आवाहन केले. आपत्तीच्या काळात स्थानिक नागरिक आणि युवकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. त्यामुळे ग्रामस्तरावर प्रशिक्षित स्वयंसेवक तयार करणे आवश्यक असल्याचेही त्यांनी नमूद केले.

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शाहू भगत यांनी मार्गदर्शन करताना वाशिम जिल्ह्याच्या सद्यस्थितीची महत्त्वपूर्ण माहिती दिली. त्यांनी सांगितले की, जिल्ह्यात सध्या १७३ पूरप्रवण गावे असून त्यापैकी ६ गावे अतिसंवेदनशील म्हणून चिन्हांकित करण्यात आली आहेत. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने मोठ्या प्रमाणावर तयारी सुरू केली आहे. आपत्तीच्या काळात तातडीने मदत पोहोचवण्यासाठी जिल्ह्यातील १४८ ग्रामपंचायतींना ५० प्रकारच्या अत्याधुनिक साहित्यांचा समावेश असलेले 'आपत्ती प्रतिसाद किट' वितरित करण्यात आले आहे. या किटमध्ये लाईफ जॅकेट, दोरखंड, प्राथमिक उपचार साहित्य, टॉर्च आणि इतर आवश्यक साधनसामग्रीचा समावेश असल्याचे त्यांनी सांगितले.

नागपूर SDRF चे प्रशिक्षक व पोलीस उपनिरीक्षक बोंदर यांनी उपस्थितांना आपत्ती निवारण, प्रथमोपचार, CPR आणि बचावकार्याचे सखोल प्रशिक्षण दिले. पुरात अडकलेल्या नागरिकांना सुरक्षित बाहेर काढणे, पाण्यात बुडणाऱ्या व्यक्तीचा जीव वाचवणे, लाईफ जॅकेटचा योग्य वापर आणि आपत्कालीन परिस्थितीत बोटींच्या माध्यमातून कमी वेळेत मदतकार्य कसे करावे, याचे थरारक प्रात्यक्षिक यावेळी सादर करण्यात आले. एकबुर्जी प्रकल्प परिसरात झालेल्या बोटींग प्रात्यक्षिकाने उपस्थितांचे विशेष लक्ष वेधून घेतले.

आपत्तीच्या काळात पोलिसांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे सांगताना उपविभागीय पोलिस अधिकारी नवदीप अग्रवाल म्हणाले की, पूरस्थिती किंवा इतर संकटांच्या काळात कायदा व सुव्यवस्था राखण्यासोबतच तातडीने मदतकार्य पोहोचविण्यासाठी पोलीस यंत्रणा चोवीस तास सज्ज राहणार आहे. महसूल विभाग आणि पोलीस प्रशासन समन्वयाने काम करून नागरिकांना त्वरित मदत उपलब्ध करून देतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या प्रशिक्षण कार्यक्रमात विविध विभागांच्या अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष सहभाग घेत आपत्ती व्यवस्थापनाच्या विविध बाबींची माहिती जाणून घेतली. प्रशासनाच्या या उपक्रमामुळे आगामी पावसाळ्यात उद्भवणाऱ्या संभाव्य संकटांचा सामना करण्यासाठी जिल्हा यंत्रणा अधिक सक्षम आणि सज्ज झाल्याचे चित्र दिसून आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विनोद मारवाडी व तौफिक बेनीवाले यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि उपस्थितांचे आभार जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शाहू भगत यांनी मानले."आपत्ती येण्यापूर्वी सज्जता हाच जीव वाचवण्याचा सर्वात मोठा मंत्र"

# निफाड तालुक्यात 'गुरव पॅटर्न'ची जोरदार चर्चा; ग्रामस्थांकडून कौतुकाचा वर्षाव

## "गुन्हेगारांसाठी कठोर सामान्य जनतेसाठी आधारवड!"

**दैनिक युवक आधार**
**निफाड राजेश भडांगे तालुका प्रतिनिधी :** निफाड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्री. गणेशजी गुरव यांनी आपल्या धडाडीच्या, निडर आणि संवेदनशील कार्यपद्धतीमुळे संपूर्ण निफाड तालुक्यात वेगळी ओळख निर्माण केली आहे. गेल्या तीन वर्षांपासून त्यांनी केलेल्या प्रभावी कामगिरीमुळे आज तालुक्यात "गुरव पॅटर्न"ची जोरदार चर्चा सुरू असून ग्रामस्थांकडून त्यांच्या कार्याचे मोठ्या प्रमाणात कौतुक केले जात आहे.

तालुक्यातील अनेक संवेदनशील प्रकरणे, गावांतील वाद, गुन्हेगारीच्या घटना तसेच सामाजिक तणावाच्या परिस्थितीत त्यांनी अनेकदा स्वतः पुढाकार घेत परिस्थिती



नियंत्रणात आणली. कायद्याचा धाक निर्माण करताना कुठेही दबावाला न झुकता घेतलेले कठोर निर्णय आणि सामान्य नागरिकांना दिलेला न्याय यामुळे त्यांच्याबद्दल लोकांमध्ये विशेष आदर निर्माण झाला आहे.

गुन्हेगारांविरोधात कारवाई करताना त्यांची भूमिका अत्यंत कठोर असते, तर दुसरीकडे एखादा गरीब, शेतकरी,

> **"आजच्या काळात सामान्य माणसाचा आवाज ऐकून घेणारे अधिकारी फार कमी उरले आहेत. पण गणेशजी गुरव साहेब कोणत्याही व्यक्तीला शांतपणे ऐकून घेतात आणि योग्य ती कारवाई करतात. त्यामुळे नागरिकांमध्ये त्यांच्याबद्दल विश्वास निर्माण झाला आहे.**
> **अभिजीत महाराज**

महिला किंवा सामान्य नागरिक अडचण घेऊन पोलीस ठाण्यात गेल्यास त्याला माणुसकीने ऐकून घेणारा अधिकारी म्हणूनही त्यांची ओळख आहे. त्यामुळेच "खाकीतला माणूस" अशी भावना नागरिकांच्या मनात त्यांच्या विषयी निर्माण झाली आहे.

तालुक्यातील वाढत्या गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवण्यासाठी त्यांनी राबवलेली विशेष मोहीम, रात्रीची गस्त, अवैध धंद्यांवर केलेल्या कारवाया, संवेदनशील भागांवर ठेवलेले बारकाईने लक्ष आणि जनतेशी थेट संवाद — या सर्व गोष्टींमुळे "गुरव पॅटर्न" हा शब्द आज सर्वसामान्यांच्या तोंडी ऐकायला मिळत आहे.

विशेष म्हणजे, कोणताही मोठा गाजावाजा न करता शांतपणे आणि परिणामकारक पद्धतीने काम करण्याची त्यांची शैली नागरिकांना अधिक भावत आहे. अनेक गावांमध्ये आजही नागरिकांकडून एकच भावना व्यक्त केली जाते —"साहेब आहेत... म्हणून अजूनही सामान्य माणूस निर्धास्त आहे!"

# आ. श्रीजयाताई चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त युवा मोर्चाचा सामाजिक उपक्रमांनी अनोखा संदेश

## लहान लोण तपोवन बुद्धभूमीत वृक्षारोपण तर पाटनूर येथे स्वच्छता अभियान उत्साहात"

**दैनिक युवक आधार**
**अर्धापूर गंगाधर कदम ग्रामीण तालुका प्रतिनिधी** : भोकर मतदारसंघाच्या जनसामान्यांच्या मनात विशेष स्थान निर्माण करणाऱ्या लोकप्रिय आमदार श्रीजयाताई अशोकराव चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता युवा मोर्चा अर्धापूर ग्रामीणच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत विविध लोकोपयोगी उपक्रम राबविण्यात आले. स्वच्छता, पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक ऐक्याचा संदेश देणारे हे उपक्रम तालुक्यात चर्चेचा विषय ठरले.

आमदार श्रीजयाताई चव्हाण यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधत पाटनूर येथील अपारंपार देवस्थान परिसरात भव्य स्वच्छता अभियान राबविण्यात आले. युवा कार्यकर्त्यांनी परिसर स्वच्छ करून समाजापुढे आदर्श निर्माण केला. यानंतर महाआरती करण्यात आली तसेच पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत वृक्षारोपण करण्यात आले.

तसेच लहान लोण येथील तपोवन बुद्धभूमी परिसरातही मोठ्या उत्साहात



वृक्षारोपणाचा कार्यक्रम पार पडला. "झाडे लावा, झाडे जगवा" हा संदेश देत युवा मोर्चाच्या पदाधिकाऱ्यांनी परिसर हिरवागार करण्याचा संकल्प व्यक्त केला. सामाजिक कार्यातून वाढदिवस साजरा करण्याच्या या अभिनव उपक्रमाचे नागरिकांकडून कौतुक करण्यात आले.

यावेळी भाजपा तालुका अध्यक्ष बालाजी गव्हाणे, युवा मोर्चा तालुकाध्यक्ष तथा कार्यक्रमाचे प्रमुख आयोजक पवन पाटील इंगोले, रामराव भालेराव, नागोराव भांगे, सरचिटणीस परमेश्वर बंडाळे, कुश भांगे, उपाध्यक्ष संभाजी पाटील शिंदे, संतोष पाटील कदम, सचिन कल्याणकर, राजू बारसे, हेमंत देशमुख, भगवान तिडके, अमोल डोंगरे, सिद्धार्थ गव्हाणे, समाधान पाटील, अरुण क्षीरसागर, प्रसेनजीत लोणे, बाबुराव शिरसागर, अंकुश कदम, नरोजी आढाव, मुंजाजी बारसे, मुकेश खंदारे, मंगेश इंगोले, चंद्रकांत कदम, अनिकेत कदम, मधुकरराव देशमुख, अशोक नवले, सतीश कोकाटे, आनंद शिंदे, दिगंबर बट्टलवाड, बाबाराव कऱ्हाळे, अरविंद शिंदे, किरण शिंदे, दत्ता बोईनवाड, दत्तारामजी मेंडके यांच्यासह युवा मोर्चाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आमदार श्रीजयाताई चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त राबविण्यात आलेल्या या सामाजिक उपक्रमांमधून युवा मोर्चाने समाजापुढे एक सकारात्मक आदर्श निर्माण केला असून, पर्यावरण संरक्षण व स्वच्छतेबाबत जनजागृती करण्याचा महत्त्वपूर्ण संदेश दिला.

## खोट्या आश्वासनांनी जनतेची फसवणूक करणाऱ्यांना धडा शिकवाच!"

# जाहीरनाम्यातील आश्वासने पूर्ण न करणाऱ्या पक्षांवर कठोर कारवाईची मागणी; संभाजी ब्रिगेडचे विभागीय अध्यक्ष गजानन भोयर आक्रमक

**दैनिक युवक आधार**
**वाशीम करण धोंगडे जिल्हा प्रतिनिधी** : निवडणुकीच्या काळात मतदारांना विविध आमिषे, घोषणा आणि मोठमोठी आश्वासने देऊन सत्ता मिळवणाऱ्या राजकीय पक्षांनी निवडणुकीनंतर जनतेकडे पाठ फिरवल्याचे चित्र सातत्याने दिसून येत आहे. निवडणुकीपूर्वी जाहीरनाम्यात दिलेली आश्वासने हवेत विरून जात असल्याने सर्वसामान्य नागरिकांमध्ये प्रचंड नाराजी निर्माण झाली आहे. याच पार्श्वभूमीवर संभाजी ब्रिगेडने आता आक्रमक भूमिका घेत, खोट्या आश्वासनांविरोधात कठोर कायदा करण्याची मागणी लावून धरली आहे.

संभाजी ब्रिगेडचे विभागीय अध्यक्ष गजानन भोयर यांनी यासंदर्भात तीव्र भूमिका मांडत, "जाहीरनामा म्हणजे जनतेसोबत केलेला करार असतो. निवडणूक जिंकण्यासाठी खोटी स्वप्ने दाखवून नंतर जनतेला विसरणाऱ्यांना कायद्याचा चाप बसलाच पाहिजे,"



असे स्पष्ट शब्दांत सांगितले.

गजानन भोयर यांनी पुढे म्हटले की, निवडणुकीत मतदारांना रोजगार, शेतकऱ्यांना कर्जमाफी, बेरोजगारांना भत्ता, महिलांसाठी योजना, शिक्षण आणि आरोग्याच्या सुविधा अशा

> **"जाहीरनामा म्हणजे जनतेचा विश्वास; तो तोडणाऱ्यांवर कठोर कारवाई झालीच पाहिजे."**
> **— गजानन भोयर, विभागीय अध्यक्ष, संभाजी ब्रिगेड**

अनेक घोषणा दिल्या जातात. मात्र सत्ता मिळाल्यानंतर बहुतांश आश्वासने अपूर्णच राहतात. त्यामुळे जनतेचा लोकशाही व्यवस्थेवरील विश्वास डळमळीत होत असून, या प्रकाराला आता आळा बसणे अत्यंत गरजेचे आहे.

संभाजी ब्रिगेडचे विभागीय अध्यक्ष गजानन भोयर यांनी मागणी केली की, ज्या पक्षाने किंवा उमेदवाराने आपल्या जाहीरनाम्यातील महत्त्वाची आश्वासने पूर्ण केली नाहीत, त्यांना पुढील निवडणूक लढवण्यास किमान दहा वर्षांची बंदी घालण्यात यावी. तसेच अशा पक्षांची निवडणूक आयोगामार्फत चौकशी करून त्यांच्यावर कठोर दंडात्मक कारवाई करण्यात यावी.

"मतदारांची फसवणूक करणाऱ्यांना माफी नाही," असा इशाराच गजानन भोयर यांनी दिला. लोकशाही टिकवायची असेल तर निवडणुकीतील आश्वासनांना कायदेशीर बंधनकारक करणे आवश्यक असल्याचेही त्यांनी नमूद केले.दरम्यान, संभाजी ब्रिगेडच्या या भूमिकेमुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले असून, अनेक नागरिकांनीही या मागणीला समर्थन दिल्याचे दिसून येत आहे. निवडणुकीत जनतेसमोर मांडलेला जाहीरनामा हा केवळ कागदावरील मजकूर नसून तो जनतेशी केलेला विश्वासाचा करार आहे. त्यामुळे तो पाळला गेला नाही तर संबंधित पक्ष व उमेदवारांना जबाबदार धरण्याची वेळ आता आली असल्याचे मत नागरिक व्यक्त करत आहेत.

# खारघर रेल्वे स्थानक परिसरात अल्पवयीन भिकाऱ्यांचा उच्छाद; विद्यार्थ्यांसह नागरिक त्रस्त

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)** : हार्बर मार्गावरील खारघर रेल्वे स्थानकातून दररोज हजारो प्रवाशी ये जा करत असतात. मोठ्या प्रमाणात रहादारी असलेल्या या परिसरात अल्पवयीन मुलांकडून भीक मागवण्याचे प्रकार वाढत असून नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. स्थानकाबाहेरील खाद्यपदार्थांच्या स्टॉल परिसरात ही मुले दिवसभर फिरत असल्याचे चित्र दिसून येत आहे.विशेष म्हणजे, स्टॉलवर खरेदीसाठी येणाऱ्या ग्राहकांना नको त्या ठिकाणी स्पर्श करून पैसे मागणे, सतत मागे लागणे, तसेच त्रासदायक वर्तन करणे असे प्रकार सर्रास घडत आहेत. यामुळे महिला, ज्येष्ठ नागरिक आणि विद्यार्थ्यांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे.

खारघर परिसरात अनेक शैक्षणिक संस्था व महाविद्यालये असल्याने दररोज मोठ्या प्रमाणात विद्यार्थ्यांची वर्दळ रेल्वे स्थानकात असते मात्र, स्थानक परिसरातील वाढत्या भिकाऱ्यांच्या त्रासामुळे विद्यार्थिनींमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. अनेक वेळा अल्पवयीन मुलांना पुढे करून भीक मागवली जात असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांकडून केला जात आहे. स्थानिकांनी प्रशासन आणि रेल्वे पोलिसांनी या प्रकाराकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने कारवाई करण्याची मागणी केली आहे. तसेच अल्पवयीन



मुलांचा वापर करून भीक मागवणाऱ्या टोळ्यांचा शोध घेऊन त्यांच्यावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

खारघर रेल्वे स्थानक परिसरात भीक मागण्याचा अत्यंत धक्कादायक आणि संतापजनक प्रकार समोर येत आहे. स्थानकात प्रवेश करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या मुख्य मार्गात एका लहान बाळाला झोपवून त्याच्या नावाखाली भीक मागितली जात असल्याचे दिसून येत आहे. मात्र, विशेष बाब म्हणजे तेच बाळ दिवसभर त्या ठिकाणी असते, पण भीक मागणाऱ्या महिला मात्र वेळोवेळी बदलत असल्याचे नागरिकांनी निदर्शनास आणले आहे.या प्रकारामुळे अल्पवयीन मुलांचा वापर करून संघटित पद्धतीने भीक मागवली जात असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. रेल्वे स्थानकाच्या मुख्य प्रवेशद्वारातच फेरीवाल्यानी आपले बस्थान बसवल्याचे पाहायला मिळत असून, थंड पेय विक्रीसाठी हातगाड्या रेल्वे स्थानकाच्या वास्तुमधेच उभ्या करून व्यवसाय केला जात असल्याचे पाहायला मिळते.

## पाली-देवद-सुकापूरमध्ये मृत्यूचा सापळा!

# धोकादायक नवजीवन सोसायटीची इमारत बाजूच्या गंगा दर्शन इमारतीवर कोसळण्याच्या स्थितीत

### १२ वर्षीय मुलाच्या मृत्यूनंतरही सिडको प्रशासन झोपेत!



> नागरिकांच्या जीवाशी खेळणाऱ्या निष्क्रिय प्रशासनाविरोधात तीव्र संताप व्यक्त होत असून, एखादी मोठी दुर्घटना घडल्यास त्यास पूर्णपणे सिडको प्रशासन जबाबदार राहील.
>
> स्थानिक नागरिक
> पाली-देवद-सुकापूर, पनवेल

**दैनिक युवक आधार**
**पनवेल दिपक कोळवणकर प्रतिनिधी** : पाली-देवद-सुकापूर परिसरातील नवजीवन सोसायटीमधील धोकादायक इमारतीचा प्रश्न अत्यंत गंभीर बनला असून नागरिकांच्या जीवितास मोठा धोका निर्माण झाला आहे. सदर इमारतीचा मोठा भाग कोसळलेला असून संपूर्ण इमारत बाजूला असलेल्या गंगा दर्शन इमारतीच्या दिशेने झुकलेली आहे. इमारतीचा वरचा भाग पूर्णपणे कोसळल्यास वरील दोन्ही मजले थेट गंगा दर्शन इमारतीवर कोसळण्याची भीती निर्माण झाली आहे. त्यामुळे कोणत्याही क्षणी मोठा अपघात होऊ शकतो.

स्थानिक नागरिकांनी वारंवार तक्रारी करूनही सिडको प्रशासनाने अद्याप कोणतीही ठोस कारवाई केलेली नाही. विशेष म्हणजे, या परिसरात यापूर्वी एका १२ वर्षीय मुलाचा दुर्दैवी मृत्यू झाला होता. तरीसुद्धा प्रशासन आणि सिडको अधिकारी झोपेत असल्याप्रमाणे निष्क्रिय दिसत आहेत, ही अत्यंत संतापजनक बाब आहे.

तीन वर्षांपासून पुनर्विकासाच्या नावाखाली नागरिकांना केवळ आश्वासने दिली जात आहेत. धोकादायक इमारती तशाच उभ्या आहेत, पण नागरिकांच्या सुरक्षेबाबत कोणतीही तातडीची उपाययोजना केली जात नाही. सिडकोने आता तरी कागदी घोडे नाचवणे थांबवून त्वरित सदर इमारत जमीनदोस्त करून परिसर सुरक्षित करावा.

# माजी पालकमंत्री बच्चू कडू यांनी घेतली श्री श्री रवीशंकरजी यांची भेट

### ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर सविस्तर चर्चा !!

**दैनिक युवक आधार**
**अकोला दिलीप कराळे प्रतिनिधी** : आर्ट ऑफ लिव्हिंग'चे संस्थापक गुरुदेव श्री श्री रवीशंकरजी यांच्या बंगलोर येथील मुख्य आश्रम येथे

अकोला जिल्ह्याचे माजी पालकमंत्री तथा विधान परिषद आमदार बच्चू कडू आणि सौ.डॉ. नैनाताई कडू यांनी आर्ट ऑफ लिव्हिंग ला ४५ वर्ष पूर्ण झाले आणि श्री श्री गुरुदेव यांच्या ७० व्या वाढदिवसानिमित्त नुकतीच सदिच्छा भेट घेऊन शुभेच्छा दिल्यात.आणि आशीर्वाद घेतले राष्ट्रनिर्माण, अध्यात्म आणि अविरत मानवसेवेच्या माध्यमातून आर्ट ऑफ लिव्हिंग संस्थेने जगभरात उभे केलेले कार्य अत्यंत अतुलनीय आणि प्रेरणादायी आहे, अशा शब्दांत आमदार बच्चू कडू यांनी यावेळी संस्थेच्या कार्याचा गौरव केला.

या महत्त्वपूर्ण भेटीदरम्यान ग्रामीण भागातील शेतकरी बांधवांच्या विविध समस्यांवर आणि सद्यस्थितीवर गुरुदेवांसोबत विशेष चर्चा करण्यात आली. प्रामुख्याने ग्रामीण भागातील



शेतकऱ्यांचे आर्थिक सक्षमीकरण, शेतीतील आधुनिक तंत्रज्ञान आणि जलसंधारण या विषयांवर चर्चा झाली. नैसर्गिक आपत्ती आणि बाजारातील चढउतार यामुळे संकटात सापडलेल्या शेतकरी बांधवांना दिलासा देण्यासाठी आर्ट ऑफ लिव्हिंगने आपल्या विविध उपक्रमांच्या माध्यमातून ग्रामीण भागात शेतकऱ्यांसाठी अधिक प्रभावीपणे कार्य करावे, अशी आग्रही विनंती गुरुदेव श्री श्री रवीशंकरजी यांना करण्यात आली.

> "अध्यात्म आणि सेवेची सांगड घालून आर्ट ऑफ लिव्हिंगने समाजात मोठे परिवर्तन घडवले आहे. हाच धागा पकडून आपल्या शेतकरी बांधवांना नैराश्यातून बाहेर काढण्यासाठी आणि त्यांच्या शाश्वत विकासासाठी संस्थेने ग्रामीण भागात आणखी गतीने काम करावे, अशी आग्रही विनंती मी गुरुदेवांना केली आहे."
>
> — वि.प. आमदार बच्चू कडू (माजी पालकमंत्री, अकोला)

"अध्यात्म आणि समाजसेवा यांची सांगड घालत आर्ट ऑफ लिव्हिंगने नेहमीच समाजातील वंचित घटकांना मुख्य प्रवाहात आणण्याचे काम केले आहे. आज देशातील बळीराजा संकटात असून , संस्थेच्या मार्गदर्शनाखाली ग्रामीण भागात शेती सुधारणेचे मोठे काम उभे राहू शकते."

**संस्थेचे ग्रामीण भागातील योगदान**

आर्ट ऑफ लिव्हिंग संस्थेने यापूर्वीही अनेक राज्यांमध्ये नद्यांचे पुनरुज्जीवन, सेंद्रिय शेती आणि शेतकरी प्रशिक्षण शिबिरांच्या माध्यमातून मोलाचे कार्य केले आहे. या कार्याची व्याप्ती आणखी वाढवून दुर्गम भागातील शेवटच्या शेतकऱ्यांपर्यंत हे साहाय्य पोहोचावे, यावर या भेटीत सकारात्मक चर्चा झाली. गुरुदेवांनीही या विनंतीला मान देत , शेतकरी कल्याणासाठी संस्था नेहमीच तत्पर राहील आणि आगामी काळात ग्रामीण भागात विशेष प्रकल्प राबवले जातील, असा विश्वास दर्शवला. या भेटीमुळे आगामी काळात ग्रामीण भागातील शेती आणि शेतकरी विकासाला एक नवी दिशा आणि बळ मिळेल , असा आशावाद व्यक्त होत आहे.

हे सर्व आर्ट ऑफ लिविंग चे प्रशिक्षक गोपाल भैय्या कराळे यांच्या पुढाकाराने घडवून आले. सोबत प्रशिक्षक अतुल कराळे, मुकेश भूतड़ा, पवन तिड़के, मोहन तिड़के, ऋषि नंदवंशी उपस्थित होते.

# वाशिम जिल्ह्याच्या विकासाचा बोजवारा; जनतेच्या प्रश्नांवर आम आदमी पार्टी आक्रमक

### रस्ते, पाणी, रोजगार, आरोग्य, शिक्षणाच्या समस्यांनी नागरिक त्रस्त

**दैनिक युवक आधार**
**वाशीम करण धोंगडे जिल्हा प्रतिनिधी** : केंद्र आणि राज्य सरकारच्या चुकीच्या धोरणांमुळे वाशिम जिल्ह्याचा विकास पूर्णपणे ठप्प झाला असून सामान्य जनता विविध समस्यांनी होरपळून निघत आहे, असा घणाघाती आरोप आम आदमी पार्टीचे जिल्हाध्यक्ष राम पाटील डोरले यांनी केला आहे. जिल्ह्यातील रस्ते, पाणी, शेती, रोजगार, आरोग्य आणि शिक्षण या मूलभूत प्रश्नांकडे सरकारने पूर्णपणे दुर्लक्ष केल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप निर्माण झाला आहे.

आम आदमी पार्टीचे जिल्हाध्यक्ष राम पाटील डोरले यांनी सांगितले की, जिल्ह्यातील अनेक रस्ते खड्डेमय बनले असून अपघातांची मालिका सुरू आहे. नागरिकांचा जीव धोक्यात घालणाऱ्या या रस्त्यांकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे. ग्रामीण भागातील परिस्थिती तर अधिकच बिकट झाली असून पिण्याच्या





पाण्यासाठी महिलांना मैलोनमैल भटकंती करावी लागत आहे.रोजगाराच्या अभावामुळे सुशिक्षित युवक नैराश्यात सापडले असून अनेकांना जिल्हा सोडून बाहेरगावी जावे लागत आहे. “तरुणांच्या हाताला काम नाही, शेतकऱ्यांच्या मालाला भाव नाही आणि जनतेला मूलभूत सुविधा नाहीत, मग विकास नेमका कुठे झाला?” असा संतप्त सवाल राम पाटील डोरले यांनी उपस्थित केला. शेती क्षेत्रात खत, बियाणे आणि

> “जनतेच्या मूलभूत प्रश्नांकडे सरकारने तात्काळ लक्ष दिले नाही, तर आम आदमी पार्टीच्या वतीने जिल्हाभर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. जनतेच्या हक्कासाठी रस्त्यावर उतरून प्रशासनाला जागे केले जाईल.”
>
> — राम पाटील डोरले
> जिल्हाध्यक्ष, आम आदमी पार्टी, वाशिम

पाण्याची कमतरता यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. नापिकी आणि वाढत्या कर्जबाजारीपणामुळे शेतकरी हवालदिल झाला असून शासनाच्या योजना फक्त कागदावरच असल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

आरोग्य विभागाची अवस्था अत्यंत दयनीय झाली असून जिल्ह्यातील अनेक शासकीय रुग्णालयांमध्ये आवश्यक सुविधा उपलब्ध नाहीत. रुग्णांना उपचारासाठी मोठ्या शहरांकडे धाव घ्यावी लागत आहे. शिक्षण क्षेत्रातही शाळांमध्ये मूलभूत सुविधांचा अभाव असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याचे चित्र आहे.

जिल्हाध्यक्ष राम पाटील डोरले यांनी पुढे सांगितले की, जनतेच्या प्रश्नांवर सरकार केवळ घोषणा आणि आश्वासनांची खैरात वाटत आहे; मात्र प्रत्यक्षात कोणतेही ठोस काम होताना दिसत नाही. त्यामुळे आता आम आदमी पार्टी जनतेच्या हक्कासाठी रस्त्यावर उतरून मोठा लढा उभारणार असल्याचा इशाराही त्यांनी दिला.वाशिम जिल्ह्यातील नागरिकांना खऱ्या अर्थाने विकास हवा आहे, केवळ भाषणबाजी नको, अशी भावना जनतेत निर्माण झाली आहे. आगामी काळात जिल्ह्यातील विविध प्रश्नांवर आम आदमी पार्टीच्या माध्यमातून तीव्र जनआंदोलन उभारले जाणार असल्याची माहितीही राम पाटील डोरले यांनी दिली.

# तहसील कार्यालयाच्या गेटवर चढून शेतकऱ्याचा आत्महत्येचा प्रयत्न

### शेतकऱ्यातील पांदण रस्ता वादाने घेतले उग्र रूप

**दैनिक युवक आधार**
**अंजनगाव सुर्जी संतोषराव घोडेराव** : तालुक्यातील देवगाव खोडगाव येथील शेतीच्या पांदण रस्त्याच्या वादातून एका शेतकऱ्याने थेट तहसील कार्यालयासमोरील गेटवर चढून दुपट्ट्याचा गळफास लावत आत्महत्येचा प्रयत्न केल्याने तहसील परिसरात एकच खळबळ उडाली.भर उन्हात सुरू झालेल्या या आंदोलनामुळे प्रशासनाची चांगलीच तारांबळ उडाली.

शेतकरी अतुल खारोडे हे तहसीलदार पुष्पा सोळंके यांच्या सांगण्यावरून शेत पांदण रस्ता मोजणीसाठी शेतात गेले होते; मात्र मोजणीदरम्यान दोन शेतकरी गटांमध्ये जोरदार वाद निर्माण झाला. यावेळी काही शेतकऱ्यांनी आपल्याला मारहाण केल्याचा आरोप अतुल खारोडे यांनी केला आहे. ‘मला तहसीलदार मॅडमने बोलावले होते; मात्र वाद सुरू झाल्यानंतर त्या तेथून निघून गेल्या. संबंधित शेतकऱ्यांवर गुन्हे दाखल करून तहसीलदारांनीच तक्रार द्यावी,’ अशी मागणी अतुल खारोडे यांनी केली.

दरम्यान, अमरावती जिल्ह्यात एल निनोच्या प्रभावामुळे तीव्र उष्णतेची लाट असून तापमान ४५ अंशांच्या आसपास पोहोचलेले असतानाही अतुल खारोडे यांनी भर उन्हात तहसील कार्यालयाच्या मुख्य गेटवर चढून दुपट्ट्याचा गळफास गळ्यात अडकवत आंदोलन सुरू केले. ‘जोपर्यंत तक्रार



दाखल होत नाही, तोपर्यंत खाली उतरणार नाही, अन्यथा जीव देईन,’ असा इशारा त्यांनी दिल्याने परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.घटनेची माहिती मिळताच पोलिस प्रशासन तातडीने घटनास्थळी दाखल झाले. अंजनगाव सुर्जीचे ठाणेदार सूरज बोंडे यांच्यासह पोलिस अधिकारी व कर्मचारी भर उन्हात परिस्थिती हाताळत होते. या प्रकारामुळे तहसील कार्यालय परिसरात नागरिकांची मोठी गर्दी झाली होती.अखेर तहसीलदार पुष्पा सोळंके व महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांनी संबंधित घटनेबाबत लेखी तक्रार तयार करून पोलिसांकडे सुपूर्द केली. त्यानंतर अतुल खारोडे हे गेटवरून खाली उतरले असून पोलिस प्रशासनासोबत पोलिस ठाण्यात जाऊन अधिकृत तक्रार दाखल करण्यात आली.

दरम्यान, या प्रकरणी दोन शेतकरी गटांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले असून पुढील तपास अंजनगाव पोलिस स्टेशनचे ठाणेदार सूरज बोंडे करीत आहेत. यापूर्वीदेखील अतुल खारोडे यांनी वीज वितरण कंपनीविरोधात आंदोलन करत अंजनगाव कार्यालय परिसरातील झाडावर चढून दुपट्ट्याचा गळफास गळ्यात अडकवत आत्महत्येचा प्रयत्न केला होता. त्यामुळे त्यांच्या आंदोलनाच्या पद्धतीची परिसरात पुन्हा चर्चा रंगू लागली आहे. पोलिस प्रशासनाच्या हस्तक्षेपानंतर अखेर परिस्थिती नियंत्रणात आली असून तहसील कार्यालय परिसरातील तणाव निवळला.

# माता रमाई आंबेडकर यांच्या स्मृतींना कनेरी/द सर्कलचा अभिवादनाचा मानाचा मुजरा




**दैनिक युवक आधार**
**रोशन खोब्रागडे लाखनी** - माता रमाई भीमराव आंबेडकर यांच्या ९१ व्या स्मृती दिनानिमित्त भारतीय बौद्ध परिषद सर्कल कनेरी/द (६० गावं) यांच्या वतीने सम्यक बुद्ध विहार समता भूमी गुरढा येथे अभिवादन कार्यक्रम भावपूर्ण वातावरणात पार पडला. यावेळी सर्कलमधील बौद्ध उपासक-उपासिकांनी मोठ्या श्रद्धेने माता रमाई यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून विनम्र अभिवादन केले.कार्यक्रमात माता रमाई आंबेडकर यांच्या त्यागमय, संघर्षमय आणि प्रेरणादायी जीवनकार्याचा गौरव करण्यात आला. समाज परिवर्तनाच्या लढ्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना खंबीर साथ देणाऱ्या माता रमाई यांचे योगदान अमूल्य असल्याचे मान्यवरांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केले.

यावेळी जयेंद्र देशपांडे (प्र अध्यक्ष), ॲड. देवेंद्र मेश्राम, कुमुदजी बडोले मॅडम, भुषण ढोके, अविनाशजी मेश्राम, प्रफुल कान्हेकर,अमरजी तिरपुडे, रक्षक गोंडाणे, विशाल मेश्राम, विनायकजी खोब्रागडे आदींसह मोठ्या संख्येने बौद्ध उपासक-उपासिका उपस्थित होते.कार्यक्रमात बुद्ध वंदना, त्रिशरण पंचशील ग्रहण करून सामाजिक समता, बंधुता आणि मानवतेचा संदेश देण्यात आला. संपूर्ण परिसरात “जय भीम”च्या घोषणांनी वातावरण भारावून गेले होते.

# खालापूर हादरले ! वृद्ध दाम्पत्याची गळा चिरून हत्या

**दैनिक युवक आधार**
**खालापूर - संतोष शेवाळे** : खालापूर तालुक्यातील निंगडोळी गावात रघुनाथ दत्तू फराट (वय ७०) आणि त्यांच्या पत्नीची गळा चिरून हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना घडली आहे. ही हत्या शंभर घरांची वस्ती असणाऱ्या मध्यवर्ती गावात मंगळवारी (दि.२६) सायंकाळच्या सुमारास घडली. त्यामुळे एकच खळबळ उडाली आहे. हत्या जमिनीच्या वादातून झाली असावी, असा प्राथमिक अंदाज असून पोलिसांनी घटनास्थळी दाखल होत सर्व बाजूंनी माहिती घेण्यास सुरुवात केली आहे. रघुनाथ फराट हे रायगड जिल्हा बँकेत सेवेत होते. सात वर्षांपूर्वी ते सेवेतून निवृत्त झाले. नंतर त्यांनी शेती तसेच सामाजिक कार्यात स्वतःला सामावून घेतले होते. शांत, सुस्वभावी व मनमिळावू रघुनाथ फराट यांची आणि त्यांच्या पत्नीची नेमकी कोणत्या कारणाने हत्या झाली आणि आरोपी कोण याचा तपास खालापूर पोलीस करीत आहेत.

रघुनाथ दत्तू फराट (वय ७५) आणि



त्यांची पत्नी सुरेखा रघुनाथ फटाट (वय ७२) अशी मृतांची नावे आहेत. त्यांची हत्या कोणत्या कारणातून झाली याचा तपास खालापूर पोलिसांसह अन्य तपास यंत्रणेकडून सुरू आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, बँकेतून सेवानिवृत्त झालेले रघुनाथ फराट आणि त्यांची पत्नी सुरेखा फराट हे दोघेच निगडोली राहत होते. त्यांची मुले खोपोली व खालापूर मध्ये वास्तव्यात आहेत. मंगळवारी दिवसभर रघुनाथ फराट यांचा मोबाईल बंद येत असल्याने त्यांच्या मुलाला संशय आला. काहीतरी अघटीत घडल्याच्या भीतीने त्यांनी मुलगा (म्हणजेच मयताचा नातू) आदित्य फराट याला निगडोलीतील गावी पाठवले.

आदित्यने घराचा दरवाजा वाजवला, मात्र आतून कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. संशय बळावल्याने आदित्याने मागच्या दरवाजातून घरात प्रवेश केला. आत जाताच त्याला समोर आजी-आजोबा रक्ताच्या थारोळ्यात पडलेले दिसले. हा भयानक प्रकार पाहून आदित्याने आरडाओरडा केला, ज्यामुळे गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने घटनास्थळी जमा झाले.

हल्लेखोरांनी रघुनाथ फराट यांचा धारदार शस्त्राने गळा कापला होता, तर त्यांची पत्नी सुरेखा यांच्या तोंडावर गंभीर वार केले होते.. धक्कादायक बाब म्हणजे, हत्या केल्यानंतर पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने किंवा क्रूरतेपोटी हल्लेखोरांनी मृतदेहांच्या अंगावर राख आणि पालापाचोळा टाकला होता. घटनेची माहिती मिळताच खालापूर पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल झाले. या गुन्ह्याची उकल करण्यासाठी फॉरेन्सिक लॅबची टीम आणि श्वानपथकाला पाचारण करण्यात आले असून, घरातून महत्त्वाचे पुरावे गोळा केले जात आहेत. घरफोडी उद्देशाने ही हत्या झाली की जुन्या वादातून? याबाबत पोलीस वेगवेगळ्या कोनातून कसून तपास करत आहेत. नातेवाईकांच्या आक्रोशाने निगडोली गावावर सध्या शोककळा पसरली आहे

# मृत्यूचा महामार्ग पुन्हा रक्तबंबाळ; भिषण अपघातात एक ठार, पाच गंभीर

**दैनिक युवक आधार**

**गेवराई : प्रतिनिधी :** कल्याण-विशाखापट्टणम राष्ट्रीय महामार्गावरील अपघातांची मालिका थांबण्याचे नाव घेत नसून बुधवारी सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास तिंतरवणीजवळील वडाचीवाडी येथे पुन्हा एक भीषण अपघात झाला. या अपघातात दुचाकीवरील एका व्यक्तीचा जागीच मृत्यू झाला असून पाच जण गंभीर जखमी झाले आहेत. मयत व गंभीर जखमी हे कोणत्या गावचे रहिवासी आहेत, हे उशिरापर्यंत समजू शकले नाही. मिळालेल्या माहितीनुसार, ब्रेझा कार क्रमांक एम.एच.14 जी.ए.0059 ही भरधाव वेगाने जात असताना समोरून येणाऱ्या दुचाकी क्रमांक एम.एच.23 ए.ए.7395 ला जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की दुचाकीवरील एक जण जागीच ठार झाला, तर दुसरा गंभीर जखमी झाला. अपघातानंतर कारने तब्बल चार पलट्या घेतल्याने कारमधील चार जण अत्यंत गंभीर जखमी झाले आहेत. घटनास्थळी काही काळ भीती आणि गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी जखमींना तातडीने बाहेर काढून उपचारासाठी रवाना केले. मात्र या घटनेनंतर पुन्हा एकदा कल्याण-विशाखापट्टणम महामार्गाच्या निकृष्ट दर्जाच्या कामाचा मुद्दा ऐरणीवर आला आहे.




गेल्या अनेक महिन्यांपासून या महामार्गावरील अपघातांच्या मालिकेबाबत सातत्याने वृत्तमालिका प्रकाशित होत असतानाही प्रशासन आणि राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण विभागाने याकडे अक्षरशः डोळेझाक केल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे. गेवराई तालुक्यातील पाडळशिंगी ते पाथर्डी तालुक्यातील खरवंडीपर्यंतच्या सुमारे ५० किलोमीटर सिमेंट रस्त्याचे काम टी अँण्ड टी कंपनीने केले आहे. मात्र या रस्त्यावर अनेक ठिकाणी लेव्हल नसणे, उंच-सखल भाग, निकृष्ट काँक्रीट, तडे आणि असमतोल बांधकामामुळे वाहने अक्षरशः हवेत उडत असल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे.

वाहन अचानक 'जंप' होत असल्याने चालकांचा ताबा सुटतो आणि गंभीर अपघात घडतात, असा आरोप वाहनधारकांकडून सातत्याने केला जात आहे. विशेष म्हणजे या महामार्गावर यापूर्वीही अनेक निष्पाप नागरिकांचा बळी गेला आहे. अनेक कुटुंबे उद्ध्वस्त झाली, तर अनेक जण कायमचे अपंग झाले. तरीदेखील संबंधित कंपनीवर कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही. दरम्यान टी अँण्ड टी कंपनीला पाठीशी घालण्याचे काम राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण विभागाकडून सुरू असून त्यामुळेच बोगस आणि थातूरमातूर काम करणाऱ्यांवर कारवाई होत नाही. कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च करून उभारण्यात आलेला हा महामार्ग आता 'मृत्यूचा महामार्ग' म्हणून ओळखला जाऊ लागला आहे.

**आणखी किती बळी गेल्यानंतर प्रशासन जागे होणार?**

महामार्गावरील सततच्या अपघातांमुळे स्थानिक नागरिकांमध्ये संतापाची लाट असून 'आणखी किती बळी गेल्यानंतर प्रशासन जागे होणार?' असा संतप्त सवाल उपस्थित केला जात आहे. रस्त्याच्या गुणवत्तेची उच्चस्तरीय चौकशी करून संबंधित कंपनी,

कामाची पाहणी करणारे अधिकारी आणि राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण विभागातील जबाबदार अधिकाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. दरम्यान, या महामार्गावरील धोकादायक ठिकाणांची तातडीने दुरुस्ती करून सुरक्षा उपाययोजना करण्यात याव्यात, अन्यथा नागरिकांच्या रोषाला सामोरे जावे लागेल, असा इशाराही स्थानिकांकडून देण्यात येत आहे.

# मीरा रोडमध्ये जनता दरबाराला उत्स्फूर्त प्रतिसाद ; आ. नरेंद्र मेहता यांनी घेतल्या नागरिकांच्या समस्या जाणून

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी - बाळकृष्ण परब :** नागरिकांच्या विविध समस्या जाणून घेऊन त्या तातडीने सोडविण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या जनता दरबारात आमदार नरेंद्र मेहता यांनी नागरिकांशी थेट संवाद साधत प्रशासनाला आवश्यक निर्देश दिले. मीरा रोड येथील दीपक हॉस्पिटलजवळ असलेल्या भाजप जिल्हा कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या या जनता दरबाराला मोठ्या संख्येने नागरिकांनी उपस्थिती लावली होती.या जनता दरबारात मिरा - भाईंदर परिसरातील पाणीपुरवठा, रस्त्यांची दुरवस्था, वाहतूक कोंडी, स्वच्छता, ड्रेनेज व्यवस्था, सार्वजनिक सुविधांची कमतरता तसेच विविध शासकीय कामांमध्ये होणारा विलंब यांसारख्या अनेक समस्यांबाबत नागरिकांनी आमदार नरेंद्र मेहता यांच्यासमोर तक्रारी मांडल्या. प्रत्येक नागरिकाची समस्या काळजीपूर्वक ऐकून घेत संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांशी तत्काळ संपर्क साधण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

जनता दरबारादरम्यान काही नागरिकांनी परिसरातील वाढती लोकसंख्या आणि त्यानुसार आवश्यक नागरी सुविधांचा अभाव याकडे लक्ष वेधले. अनेक भागांमध्ये रस्त्यांची दुरवस्था आणि पावसाळ्यात निर्माण होणाऱ्या समस्यांमुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याचे सांगण्यात आले. यावर उपाययोजना करण्यासाठी संबंधित यंत्रणांशी समन्वय साधून लवकरात लवकर कामे पूर्ण केली जातील, असे आश्वासन आमदार नरेंद्र मेहता यांनी दिले.यावेळी बोलताना नरेंद्र मेहता म्हणाले की, "जनतेचा विश्वास हाच माझा खरा सन्मान आहे. नागरिकांच्या समस्या समजून घेऊन त्या सोडविण्यासाठी मी कायम कटिबद्ध आहे. जनता दरबार हा नागरिक आणि प्रशासन यांच्यातील दुवा असून लोकांच्या अडचणी थेट जाणून घेण्यासाठी हा उपक्रम महत्त्वाचा ठरत आहे."जनता दरबारात उपस्थित असलेल्या अनेक नागरिकांनी आपल्या समस्या मांडण्यासोबतच परिसरातील विकासकामांबाबत सूचना देखील दिल्या. काहींनी प्रलंबित विकासकामे तातडीने पूर्ण करण्याची मागणी केली तर काहींनी स्वच्छता आणि वाहतूक व्यवस्थेत सुधारणा करण्याची अपेक्षा व्यक्त केली.दरम्यान, मिरा रोड परिसरात सध्या विविध सामाजिक आणि नागरी प्रश्नांमुळे वातावरण संवेदनशील बनले असताना नागरिकांशी संवाद साधण्याच्या या उपक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. स्थानिक पातळीवरील समस्या तातडीने सोडवून प्रशासनावरील नागरिकांचा विश्वास अधिक दृढ करण्याचा प्रयत्न या माध्यमातून होत असल्याचे मत उपस्थित नागरिकांनी व्यक्त केले.या जनता दरबारात स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच विविध विभागांचे प्रतिनिधी उपस्थित होते. नागरिकांनी मांडलेल्या प्रश्नांवर तत्काळ कार्यवाही करून संबंधित विभागांना अहवाल सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या. आगामी काळातही अशाच प्रकारे नियमित जनता दरबार आयोजित करून नागरिकांच्या समस्या सोडविण्यावर भर दिला जाणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

# सोन्याची चैन खेचून नागरिकांवर केली दगडफेक

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी :** 38 वर्षीय ईसमाच्या स्कुटीला गाडी आडवी लावून मारहाण केली आणि सोन्याची चैन खेचून घेऊन जात असताना नागरिकांना दगडफेक करून भीती दाखवली आणि स्कुटीवर पळून गेल्याप्रकरणी तकदीर आणि त्याच्यासोबत असलेल्या दोन इसमाविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात 27 मे रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.गणेश ज्ञानेश्वर गवस हे कोनगाव येथे राहत असून 27 मे रोजी चारच्या सुमारास डी मार्टच्या अलीकडे भारत बेंज शोरूम समोर रस्त्यावर पळस्पे फाटा येथे तकदीर आणि त्याचे दोन साथीदार यांनी त्याची स्कुटी गणेश याच्या स्कुटीला आडवी लावली. आणि त्याला मारहाण करून हाताला चावा घेतला व त्याच्या गळ्यातील दहा ग्रॅम वजनाची सोन्याची चैन आणि पेंडंट जबरदस्तीने खेचून घेऊन जाऊ लागले. यावेळी सोडवण्यास आलेल्या नागरिकांना दगडफेक करून त्यांनी भीती दाखवली आणि पनवेलच्या दिशेने ते स्कुटीवर निघून गेले.

# महागाव नगरपंचायतीचा भोंगळ कारभार

## ग्रामस्थांनी दोनदा स्मरणपत्र देऊनही प्रभाग क्रमांक 8 अंधारात आणि घाणीच्या विळख्यात ; नगरपंचायत कार्यालयासमोर ग्रामस्थांचा तीव्र आंदोलनाचा इशारा

**दैनिक युवक आधार**

**एम डी सुरोशे महागाव (यवतमाळ ) :** महागाव नगरपंचायतीच्या निष्क्रिय, ढिसाळ आणि नागरिकविरोधी कारभारामुळे प्रभाग क्र. ८ मधील रहिवाशांचे जीवन अक्षरशः त्रस्त झाले आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून प्रभागातील पथदिवे बंद असल्याने संपूर्ण परिसर अंधाराच्या छायेत गेला आहे, तर मुख्य बंद नाली कचरा, गाळ आणि साचलेल्या पाण्याने तुंबून घाणीचे साम्राज्य निर्माण झाले आहे. विशेष म्हणजे, नागरिकांनी वारंवार लेखी अर्ज आणि दोन वेळा स्मरणपत्र देऊनही प्रशासनाने कोणतीही ठोस कारवाई न केल्याने संतप्त नागरिकांनी आता आंदोलनाचा इशारा दिला आहे. प्रभाग क्र. ८ मधील नागरिकांनी २१ एप्रिल २०२६ रोजी नगरपंचायतीकडे लेखी अर्ज देऊन बंद पथदिवे दुरुस्त करण्याची आणि तुंबलेली नाली साफ करण्याची मागणी केली होती. मात्र, महिनाभर उलटूनही कोणतीही कारवाई झाली नाही. त्यानंतर नागरिकांनी २१ मे रोजी पुन्हा स्मरणपत्र सादर केले, तरीसुद्धा प्रशासनाने या गंभीर समस्यांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचा आरोप होत आहे. स्थानिकांच्या मते, "नगरपंचायत फक्त कागदावर चालते का ?" असा प्रश्न आता नागरिक विचारू लागले आहेत. तुंबलेल्या नाल्यांमधून दूषित पाणी रस्त्यावर वाहत असून संपूर्ण परिसरात तीव्र दुर्गंधी पसरली आहे. डासांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर वाढल्याने मलेरिया, डेंग्यू आणि इतर साथीच्या रोगांचा धोका निर्माण झाला आहे. त्यातच रात्रीच्या वेळी प्रभाग संपूर्ण अंधारात असल्यामुळे महिला, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. रहिवाशांनी अंधाराचा फायदा घेऊन चोरी किंवा इतर अनुचित घटना घडण्याचीही भीती व्यक्त केली आहे.

**"आम्ही दोन वेळा लेखी अर्ज आणि स्मरणपत्र देऊनही नगरपंचायत प्रशासनाला जाग येत नसेल, तर सामान्य नागरिकांनी न्याय कुणाकडे मागायचा ? प्रभागातील लोक घाणीमध्ये आणि अंधारात जगत आहेत. नगर पंचायतचे अधिकारी फक्त आश्वासने देतात, पण प्रत्यक्षात कोणतीही काम करत नाहीत. जर दोन दिवसांत पथदिवे सुरू झाले नाहीत आणि नालीवरील साफसफाई झाली नाही, तर आम्ही नगरपंचायत कार्यालयासमोर तीव्र आंदोलन छेडू." आणि प्रशासनाने तातडीने कारवाई न केल्यास प्रभागातील नागरिक रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करू ..**

**- समाधान कदम, ग्रामस्थ, प्रभाग क्रमांक 8, महागाव, ता. महागाव.**



**प्रशासकीय असंवेदनशीलता हीच खरी समस्या!"प्रभाग ८ मधील बंद नाली ही केवळ अस्वच्छतेची समस्या नसून, ती महागाव नगरपंचायत प्रशासनाच्या संवेदनाहीनतेचे प्रतीक आहे. महिनाभरापूर्वी केलेल्या अर्जावर आणि त्यानंतर दिलेल्या स्मरणपत्रावरही प्रशासनाने मौन बाळगणे, हे लोकशाहीतील जनभावनेचा अनादर करणारे आहे. जनतेच्या आरोग्याशी आणि विश्वासाशी खेळण्याचा अधिकार अधिकाऱ्यांना कोणी दिला? प्रशासनाने आपली कर्तव्याची जाणीव पुनरुज्जीवित करावी आणि विनाविलंब ही समस्या निकाली काढावी अन्यथा प्रभागातील नागरिक रस्त्यावर उतरून किंवा आंदोलन करू.**

**ओम कुसंगवार (सामाजिक कार्यकर्ते, महागाव)**

# किनारी सुरक्षेसाठी समन्वय यंत्रणा अधिक सक्षम करणार – मंत्री नितेश राणे



**मुंबई :** महाराष्ट्राचा विस्तीर्ण समुद्रकिनारा लक्षात घेता किनारी सुरक्षा अधिक सक्षम करणे ही काळाची गरज आहे. राज्यातील सर्व संबंधित यंत्रणांमध्ये समन्वय वाढवून आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने सागरी सुरक्षा व्यवस्था अधिक मजबूत करण्यात येईल. मच्छीमार, किनारी भागातील नागरिक आणि सागरी वाहतुकीची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध असल्याचे मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी सांगितले.

मंत्रालयात सागरी किनारीपट्टी सुरक्षेच्या अनुषंगाने आयोजित बैठकीत मंत्री राणे बोलत होते. यावेळी मत्स्यव्यवसाय विभागाचे सचिव रामास्वामी एन, महाराष्ट्र सागरी मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदीप पी. मत्स्यव्यवसाय आयुक्त प्रेरणा देशभ्रतार, महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक प्रकाश खपले यांच्यासह विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

राज्यातील किनारी सुरक्षेची यंत्रणा अधिक सक्षम करण्यासाठी विविध विभागांमध्ये प्रभावी समन्वय वाढविणे, सागरी गस्त अधिक बळकट करणे तसेच पोलीस विभागासाठी आवश्यक जेट्टी सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत राज्य शासन गंभीर असल्याचे मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी सांगितले.

# क्रीडा प्रबोधिनी निफाड अयोजित'स्वराज्यरक्षक धर्मवीर राजे संभाजी महाराज' जयंतीनिमित्त जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धा उत्साहात संपन्न!

**दैनिक युवक आधार**

**निफाड क्रीडा प्रतिनिधी विलास गायकवाड :** निफाड /-क्रीडा प्रबोधिनी निफाड यांच्या वतीने स्वराज्यरक्षक धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेली 'जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धा' अत्यंत रोमांचक आणि उत्साही वातावरणात संपन्न झाली. जिल्ह्यातील तब्बल २४ मातब्बर संघांनी या स्पर्धेत आपला दमदार सहभाग नोंदवला होता. निफाडकर क्रीडाप्रेमींच्या उत्स्फूर्त प्रतिसादाने मैदानावर अभूतपूर्व उत्साह पाहायला मिळाला.

या स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक ब्रह्म आडगाव,द्वितीय क्रमांक ब्रह्मा आडगाव बी, तृतीय क्रमांक रुद्र सिन्नर चतुर्थ क्रमांक क्रीडा प्रबोधिनी निफाड यांनी मिळवल्याबद्दल त्यांचे निफाड शहरात सर्वत्र अभिनंदन होत आहे

**मान्यवरांच्या उपस्थितीत दिमाखदार उद्घाटन**

स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी

**( उत्कृष्ट नियोजन दत्तू रायते,विलास गायकवाड )**




शिवसेना निफाड *तालुकाप्रमुख तथा उपनगराध्यक्ष अनिल अण्णा कुंदे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. यावेळी खेळाडूंना आणि उपस्थितांना संबोधित करताना त्यांनी "खेळाडूंनी छत्रपती संभाजी महाराजांचा जाज्वल्य इतिहास डोळयांसमोर ठेवून मैदानावर शौर्य आणि खिलाडूवृत्ती दाखवावी," असे मोलाचे मार्गदर्शन केले.

**प्रमुख सहयोग आणि मार्गदर्शन**

या भव्य क्रीडा महोत्सवासाठी भारतीय जनता पार्टीचे जिल्हा सरचिटणीस संजय गाजरे, ज्येष्ठ मार्गदर्शक नंदलालजी काका चोरडिया, आणि क्रीडाप्रेमी तसेच कुंदन हॉटेलचे संचालक स्वप्निल दादा गोळे व भीमराव काळे, विलास निरभवणे, राजेंद्र सोमवंशी, यांचे मोलाचे सहकार्य व मार्गदर्शन लाभले. त्यांच्या खंबीर पाठिंब्यामुळेच ही स्पर्धा भव्य स्वरूपात साकारता आली.

**युवा कार्यकर्त्यांचे अचूक नियोजन आणि अथक परिश्रम**

स्पर्धेचे मुख्य आयोजक दत्तू रायते आणि विलास गायकवाडव, चेतन कुंदे यांच्या नेतृत्वाखाली स्पर्धेचे उत्कृष्ट नियोजन करण्यात आले होते. स्पर्धा शिस्तबद्ध आणि यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी अमोल अहिरे, आदित्य सूर्यवंशी, आणि साजिद शेख,अजय मेधने,शिवकुमार बोरगुडे,संकेत खताळेअमोल देवकर,संकेत बोरगुडे,मितेशजाधवनिलेशपगारे,सोनू मंडलिक,विकास मुरकुटे,पियुष यादव,सोनू महतो,अनमोल यादव,सदा कांदळकरसंस्कार वघुले,अमित निकम,साहिल केदारे,ऋषीकेश गडाख या युवा कार्यकर्त्यांनी व क्रीडाप्रेमींनी अहोरात्र कष्ट घेतले.

**खेळाडूंच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी आणि ग्रामीण भागातील क्रीडा कौशल्याला व्यासपीठ मिळवून देण्यासाठी अशा स्पर्धांचे आयोजन करणे गरजेचे आहे. राजे संभाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त या ऊर्जेला एक वेगळीच दिशा मिळाली."**

**— आयोजक समिती**

**निफाडकरांचे आशीर्वाद आणि आभार**

निफाड नगरीत या स्पर्धा अत्यंत चुरशीच्या आणि ऐतिहासिक पद्धतीने पार पडल्या. या यशस्वी आयोजनामागे निफाड तालुक्यातील समस्त ग्रामस्थ, नगरसेवक, उपनगराध्यक्ष आणि क्रीडा रसिकांचे मोलाचे सहकार्य लाभले. हे सहकार्य आम्हा आयोजकांसाठी एका आशीर्वादासारखे आहे, अशा भावना क्रीडा प्रबोधनीच्या वतीने व्यक्त करण्यात आल्या.शेवटी, क्रीडा प्रबोधनी निफाड परिवाराच्या वतीने या स्पर्धेत सहभागी झालेले सर्व संघ, क्रीडाप्रेमी, ग्रामस्थ आणि प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहकार्य करणाऱ्या सर्वांचे मनापासून आभार मानण्यात आले."नेत्रदीपक नियोजन आणि खेळाडूंचा उत्साह! क्रीडा प्रबोधनी निफाडचे अध्यक्ष दत्तू रायते आणि विलास गायकवाड यांच्या अचूक नियोजनाच्या जोरावर या स्पर्धेने यशाचे एक नवे शिखर गाठले." सूत्रसंचालन विलास गायकवाड यांनी केले तर आभार दत्तू रायते यांनी आभार मानले.

# नसरापूर प्रकरणाचा फास्ट निकाल लागणार



**पुणे :** नसरापूर येथील अल्पवयीन मुलीवरील लैंगिक अत्याचार आणि हत्या प्रकरणातील खटल्याची सुनावणी गुरुवारी (२८ मे) विशेष न्यायालयात पार पडली. या प्रकरणातील मुख्य आरोपी भीमराव कांबळे याच्यावर न्यायालयीन प्रक्रियेनुसार सर्व आरोप निश्चित करण्यात आले आहेत. अत्यंत वेगाने तपास पूर्ण करत पोलिसांनी फक्त २८ दिवसांत कायदेशीर बाबी पूर्ण करून न्याय मिळवण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. न्यायालयाकडून आरोपीविरोधात प्राईमा फेसी पुरावे असल्याचे निरीक्षण न्यायालाकडून नोदवण्यात आले असून आता खटल्याची रोज सुनावणी इन कॅमेरा पद्धतीने होणार असल्याची माहिती समोर आली आहे.विशेष सरकारी वकील ॲड. अजय मिसर, पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल आणि तपास अधिकारी या सुनावणीवेळी न्यायालयात उपस्थित होते. खटल्याच्या सुनावणीदरम्यान पोलिसांनी पोस्टमार्टम रिपोर्ट आणि विविध वैद्यकीय चाचण्यांचे पुरावे सादर केले.